




नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR



पाहिजे

इंग्लिश व मराठी टायपिंग येणारा डीटीपी ऑपरेटर पाहिजे. वकिलांकडील कामाचा अनुभव असलेल्यास प्राधान्य.

संपर्क : 9890022237



वर्ष ५३ वे, अंक २८१
Year : 53, Issue No. : 281

नाशिक, शनिवार दि. २८ मार्च २०२६
Nashik, Saturday 28 March 2026

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2


### कृष्णाचा अवतार असल्याचे भासवत खरातने

## नेवाशाच्या व्यापाऱ्याला घातला अडीच लाखांचा गंडा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- व्यवसायामध्ये येणाऱ्या अडचणींचे निवारण होऊन प्रगती व्हावी, याकरीता ज्योतिषी अशोक खरात याने कृष्णाचा अवतार असल्याचे सांगून नेवाशाच्या व्यापाऱ्याकडे अडीच लाख रुपये व सोन्याच्या अंगठ्या काढून घेत फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी राजेंद्र नानासाहेब भागवत (रा. गाडेनगर, नेवासा फाटा, जि. अहिल्यानगर) हे कापड दुकानदार आहेत. त्यांच्या व्यवसायामध्ये प्रगती होत नसल्याने भागवत यांचे काका ज्ञानदेव तगरे यांनी नाशिकमध्ये त्यांच्या ओळखीच्या असलेल्या कॅप्टन अशोक खरात हे ज्योतिषी असून,त यांच्याकडे जाऊन सल्ला घेण्याचे सांगितले. त्यानुसार डिसेंबर २०२२ मध्ये फिर्यादी हे पत्नी जयश्री भागवत व काका असे सर्व जण खरातच्या ओकस लॅण्ड डेव्हलर्सच्या कार्यालयात गेले. खरात याची भेट घेतल्यानंतर त्यांनी भागवत यांच्या अडचणी समजावून घेतल्या. मी कृष्णाचा अवतार आहे, तुम्हाला मंत्राने भारुन पुष्कराज व हिरा देतो, अंगठ्या देतो, तुम्ही सोन्याच्या अंगठीमध्ये दिलेला पुष्कराज रत्न व हिरा परिधान करा, त्यामुळे तुम्हाला दिव्य शक्ती प्राप्त होऊन व्यवसायात अनेक पटीने वृद्धी होईल, त्यासाठी सोन्याच्या अंगठ्या लागतील. त्यामध्ये मी पुष्कराज खडा टाकून दिल्यावर तो तुम्ही गुरुवारी परिधान करा. अंगठ्या तयार झाल्यावर तुम्हाला फोन करुन सांगू तेव्हा तुम्ही या अंगठ्या घेऊन जा, एका पुष्कराज खड्याची किंमत ७५ हजार रुपये आहे. तुमच्याकडे आता सोन्याच्या अंगठ्या असतील तर द्या, असे फिर्यादी भागवत यांना सांगितले. त्यानुसार भागवत यांनी सोन्याच्या दोन अंगठ्या व त्यांच्या पत्नीची १ अंगठी अशा तीन सोन्याच्या अंगठ्या व पुष्कराज खड्याची आगाऊ रक्कम म्हणून १ लाख रुपये अशोक खरात याच्याकडे दिले.

४-५ दिवसांनंतर खरात याच्या कार्यालयातून ऑफिस बॉयने फोन करुन अंगठ्या घेऊन जा असे सांगितले. त्यानुसार भागवत हे अंगठ्या घेण्यासाठी आले. त्यांनी उर्वरीत १ लाख ६२ हजार रुपये देऊ केले असता खरात याने ही रक्कम चेक स्वरुपात स्वीकारण्यास नकार देऊन रोख रक्कम मागितली. तेव्हा फिर्यादीने त्याच्याकडील १ लाख रुपये व त्यांच्यासोबत असलेला मित्र सचिन राठोड यांच्याकडून ६२ हजार रुपये घेऊन अशोक खरात याला पुन्हा १ लाख ६२ हजार रुपये रोख स्वरुपात दिले. या अंगठ्या घेऊन फिर्यादी घरी आले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे अंगठ्या बोटात घालूनही व्यवसायात कोणताही फरक पडला नाही, त्यादरम्यान वर्तमानपत्रांमध्ये खरातबाबत गुन्हा दाखल झाल्याचे समजल्याने फिर्यादी यांनी हातातील अंगठ्या व खडे चेक केले असता खरातने दिलेले खडेव हिऱ्याची किंमत फक्त ५ हजार रुपये असल्याचे व त्या तांब्याच्या धातूमध्ये तयार केल्याचे समजले. त्यानुसार भोंदू अशोक खरात याने फिर्यादी भागवत यांची वीस ग्रॅम सोन्याच्या अंगठ्यांचा अपहार करुन २ लाख ६२ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अशोक खरातविरुद्ध आणखी एक बलात्काराचा गुन्हा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- कौटुंबिक समस्येवर सल्ला घेण्यासाठी गेलेल्या महिलेवर पिण्याच्या पाण्यात गुंगीचे औषध टाकून बलात्कार करणाऱ्या भोंदू ज्योतिषी अशोक खरातविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिला ही पती व दोन मुलांसह राहते. पिडीत महिलेचा २५ मे २०१३ रोजी विवाह झाला. त्यानंतर सन २०१४ मध्ये तिला मुलगी झाली. त्यानंतर पती-पत्नीमध्ये वाद होऊ लागले. तेव्हापासून ही महिला पतीपासून विभक्त राहू लागली. सन २०२२ मध्ये पिडीतेला तिच्या एका नातेवाईकाने मिरगाव येथे अशोक खरात याच्याकडे ईशानेश्वर महादेव मंदिर येथे नेले. तेव्हा अशोक खरात याने दोघा पती-पत्नीला समजावून सांगितले. त्यामुळे दोघे जण पुन्हा सोबत नांदू लागले. त्यामुळे या दाम्पत्याचा भोंदूबाबावर विश्वास बसला. त्यानंतर पुन्हा मार्च २०२२ मध्ये अशोक खरात याला भेटण्यासाठी पिडीत महिला व तिच्या पतीने कॅनडा कॉर्नर येथे ओकस प्रॉपर्टी या कार्यालयामध्ये गेले. प्रथम भोंदूने त्यांना बराचवेळ त्यांना वेटींगवर बसवले. पिडीतेचा नंबर आल्यानंतर भोंदूने या दाम्पत्याला कॅबिनमध्ये बोलावले. दोघांची जन्मतारीख विचारुन लग्नाची तारीख विचारली. त्यावरुन त्यादिवशी शनिवार होता. आणि हा वार लग्नासाठी चांगला नव्हता. असे सांगितले. आणि यामुळेच तुमच्यामध्ये वाद होतात. त्यानंतर या दाम्पत्याने आमच्या शेतात कोणते पिक घेतले पाहिजे, असा सल्ला भोंदूबाबाला विचारला. त्यावर भोंदूबाबाने कमी मेहनतीमध्ये जास्त नफा मिळवून देणारी पिके घेण्याचा सल्ला दिला. थोड्या वेळाने या दाम्पत्याला नारळ पाणी आणि काही तरी ज्यूस प्रसाद म्हणून दिला. अशोक खरातकडे फिर्यादी आणि तिचा पती सन २०२२ ते डिसेंबर २०२४ पर्यंत सहा ते सात वेळा खरातला त्याच्या ऑफिसमध्ये भेटण्यासाठी गेले होते.

ऑगस्ट २०२४ मध्ये हे दाम्पत्य पुन्हा खरातकडे भेटायला आले. त्यावेळी फिर्यादी महिला समोर बसलेली असताना भोंदूने त्यांना काही अडीअडचण आहे का, असे विचारले व पिडीतेच्या पतीला बाहेर जावून बसायला सांगितले. त्यानुसार पिडीतेचा पती बाहेर जाऊन बसला. त्यानंतर खरातने पिडीतेला तांब्याच्या भांड्यामध्ये पाणी प्यायला दिले. आणि त्याच्याजवळ बोलावून घेत एक तांब्याचे भांडे पिडीतेच्या डोक्यावर ठेवून गायत्री मंत्र म्हणायला सांगितला. त्यानंतर अशोक खरात पाठीमागे येऊन उभा राहिला. त्यानंतर त्याने पिडीतेला मिठीत घेतले. पिडीतेच्या अंगावर हात फिरवत मी महादेवाचा अवतार आहे, माझ्याकडे दैवी शक्ती आहे. येथून पुढे तुमचे दिवस खूप चांगले असतील, तुमची खूप प्रगती होईल. तु फक्त मी सांगेल त्याप्रमाणे कर असे बोलून त्याने फिर्यादी महिलेला टेबलावर बसायला सांगितले. आणि पिडीतेसोबत तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने बलात्कार केला. पिडीतेने विरोध केला असता तु जर कोणाला काही सांगितले तर मी माझ्याकडील शक्तीने तुझ्या मुलांना मारुन टाकेल आणि तुझे आयुष्य उद्ध्वस्त करेल, अशी धमकी दिली. त्यामुळे भेदरलेल्या महिलेने आजपर्यंत ही बाब कोणाला सांगितली नव्हती. मात्र भोंदू अशोक खरातविरुद्ध रोजच तक्रारी वाढू लागल्याने पिडीतेने हा प्रकार तिच्या पतीला सांगितला. त्यानंतर तिने पतीसह सरकारवाडा पोलीस ठाणे गाठून अशोक खरातविरुद्ध फिर्याद दिली आहे.

## हॉटेल मालकाचा हप्ता देण्यास नकार टोळक्याकडून हॉटेलमध्ये तोडफोड

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- हप्ता देण्यास विरोध केल्याच्या रागातून आठ जणांच्या टोळक्याने हॉटेलमधील फ्रीज, टेबलसह हॉटेलबाहेर उभ्या असलेल्या वाहनांच्या काचा फोडून नुकसान केल्याप्रकरणी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी संतोष ठाकूरदास कुकरेजा (रा. सिद्धी पार्क, न्यू पंडित कॉलनी) यांचे पंडित कॉलनी लेन नंबर ३ येथे न्यू सिबा स्नॅक्स नावाचे हॉटेल आहे. काल (दि. २७) दुपारी १२ वाजेच्या सुमारास आरोपी प्रतीक सुदर्शन सोनार, अल्पेश रॉबर्ट म्हस्के, रोशन अमोल खिराळे, करण शेखरे, पराग जाधव, तन्मय, आदित्य तायडे, दुर्गेश व इतरांनी गैरकायद्याची मंडळी जमा केली व ते फिर्यादीच्या हॉटेलमध्ये आले. कुकरेजा यांच्याकडे गँगचा हप्ता मागितला असता त्यांनी त्याला विरोध केला. याचा राग आल्याने या टोळक्याने तीन ते चार कोयते हातात घेऊन हॉटेलमधील फ्रीज व टेबलचे नुकसान केले, तसेच हॉटेलबाहेर पार्क असलेल्या दोन वाहनांच्या काचा फोडून ८० हजार रुपयांचे नुकसान केले, तसेच परिसरामध्ये दहशत माजवून ''हा एरिया आमच्या गँगचा आहे. सर्वांना हप्ता द्यावाच लागेल. जो कोणी हप्ता देणार नाही, त्याचा गेमच करतो,'' असे बोलून हवेत कोयते फिरविले.

या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील करीत आहेत.

## तोतया पोलिसांनी लांबविले वृद्धेचे तीन तोळ्यांचे दागिने

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- वॉकिंग करणाऱ्या वृद्धेच्या जवळील तीन तोळ्यांचे सोन्याचे दागिने तोतया पोलिसांनी हातचलाखीने लंपास केल्याची घटना लॅम रोड येथे घडली.

फिर्यादी मंदा तुकाराम कोटकर (वय ८०, रा. लीला गोविंद अपार्टमेंट, लॅम रोड, नाशिक) या व त्यांच्या ओळखीच्या प्रेमलता जयप्रकाश बर्डे या दोन महिला सौभाग्यनगर येथे नाना-नानी पार्कजवळ वॉकिंग करीत होत्या. त्यावेळी एका मोटारसायकलीवरून दोन इसम त्यांच्याजवळ आले. ''आम्ही पोलीस आहोत. आमची गस्त चालू आहे. पुढे एका महिलेला चाकू मारलेला आहे. तुम्ही तुमच्या गळ्यातील दागिने काढून ठेवा.'' त्यानंतर फिर्यादी महिलेने दागिने काढले असता हे दागिने तोतया पोलिसांनी त्यांच्याकडील कागद काढून त्यात ठेवून त्या कागदाची हातचलाखी केली व बारीक दगड असलेला कागद प्रेमलता बर्डे यांच्या पर्समध्ये दागिने ठेवल्याचे भासवून फिर्यादीच्या १ लाख ४० हजार रुपये किमतीचे प्रत्येकी ७० हजार रुपये किमतीची एक चेन व मंगळसूत्र असे तीन तोळ्यांचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार पोलीस हवालदार टेमगर करीत आहेत.

## दहा लाख रुपयांचा अपहार करून विवाहितेचा मानसिक छळ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- कोणत्या ना कोणत्या कारणावरून बदनामी करून विवाहितेकडून घेतलेल्या २१ लाख रुपयांपैकी दहा लाख रुपयांचा अपहार करून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी महिलेचे मुंबई नाका परिसरात माहेर आहे. फिर्यादी फेब्रुवारी २०२४ ते मार्च २०२६ या कालावधीत सिन्नर फाटा येथे सासरी नांदत होती. त्यावेळी पती व सासरे यांनी संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या आईवडिलांना कोणत्या ना कोणत्या कारणावरून बदनामी केली व फिर्यादीकडून २१ लाख २५ हजार रुपये घेऊन त्यातील फक्त ११ लाख २५ हजार रुपयेच परत केले. फिर्यादीने उर्वरित दहा लाख रुपये परत मागितल्याच्या कारणावरून वाद घातला, तसेच पैसे मागितल्याच्या कारणावरून नांदायला येऊ नकोस, असे म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला मारहाण केली. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात पतीसह सासऱ्याविरुद्ध छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पाथर्डी फाटा येथे महिलेचा विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- अश्लील शब्द उच्चारून हावभाव करून एका इसमाने महिलेचा विनयभंग केल्याची घटना पाथर्डी फाटा येथे घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी महिला ही काल (दि. २७) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास घरी होती. त्यावेळी आरोपी संदीप बाबूराव साळवे (रा. ज्ञानेश्वरनगर, पाथर्डी फाटा, नाशिक) याने पीडितेकडे लैंगिक संबंधाची मागणी करीत अश्लील शब्द उच्चारून हावभाव केले, तसेच नेहमी पाठलाग करून पीडितेचा विनयभंग केला. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात संदीप साळवेविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार देवरे करीत आहेत.

## नेपाळच्या माजी पंतप्रधानांना अटक

**कोठमांडु (भ्रमर वृत्तसेवा)** :- सप्टेंबरमध्ये झालेल्या आंदोलकांवरील हिंसक कारवाईतील भूमिकेबद्दल नेपाळचे माजी पंतप्रधान के.बी. शर्माओली यांना अटक करण्यात आली आहे. पंतप्रधान बालेंद्र शाह व त्यांच्या मंत्रिमंडळाने शपथ घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई झाली.

## एसआयटीकडून खरातच्या ऑफिसची पुन्हा झडती

### एचआयव्ही टेस्ट देखील निगेटिव्ह

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- भोंदूबाबा खरात प्रकरणांमध्ये पुन्हा एकदा एसटीच्या पथकाने कार्यालयात जाऊन झाडाझडती घेतली यामध्ये अजून काही माहिती या पथकाला मिळाली आहे. दरम्यान पोलिसांनी खरात याची एचआयव्ही केलेली टेस्ट ही निगेटिव्ह आल्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

भोंदू बाबा अशोक खरात याच्या पोलीस कोठडीची मुदत ही रविवारी संपणार आहे. त्यापूर्वी आता विशेष तपास पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेने तपासाला गती दिली असून वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये तपास सुरू केलेला आहे. आता या सर्व प्रकरणांमध्ये तपास करत असताना वनविभागाच्या कायद्यानुसार देखील एसआयटीकडून तपास सुरू आहे. तसेच या सर्व प्रकरणांमध्ये नियमांचे उल्लंघन कुठे झाले आहे का याचाही तपास आता सुरू आहे. या सर्व प्रकरणांमध्ये परत एकदा काल विशेष तपास पथक आणि गुन्हे शाखेच्या पथकाने खरात यांच्या प्रॉपर्टी खरेदी-विक्रीच्या असलेल्या ऑफिसचे सील तोडून परत तपास केला आणि अजून काही माहिती तसेच कागदपत्र गोळा केल्याचे सांगितले जात आहे. याबाबत अजून पोलिसांनी दुजोरा दिला नसला तरी ऑफिसची मात्र झडती घेण्यात आलेली आहे. यामध्ये जी काही कागदपत्र मिळाले आहे त्याचा अभ्यास करत असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे १०० पेक्षा अधिक बायकांशी लैंगिक संबंध ठेवणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात याची प्रशासनाने एचआयव्ही टेस्ट केली ही एचआयव्ही टेस्ट निगेटिव्ह आल्याचे समोर आले आहे. याबाबतचा अहवाल हा थेट न्यायालय सादर करण्यात येणार असला तरी पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या अहवालामध्ये निगेटिव्ह असल्याचे समोर आल्यामुळे सगळ्यांनाच धक्का बसला आहे. येणाऱ्या काळामध्ये या सर्व प्रकरणात नवीन काय माहिती समोर येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रुपाली चाकणकर, दीपक केसरकर यांची चौकशी करण्याची मागणी

### उबाठाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी नाशिक भेटीत केले आरोप

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या पलीकडे भयानक असे भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण असून याच्याविरोधातील लैंगिक अत्याचार आणि फसवणूक प्रकरणात माजी महिला आयोग अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करून त्यांच्याबरोबरच शिक्षण मंत्री केसरकर यांची देखील चौकशी केली जावी, अशी मागणी शिवसेना उबाठा गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केली.



सुषमा अंधारे काल नाशिक येथे आल्या होत्या. त्यांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांची भेट घेतली. भोंदू बाबा खरात प्रकरण एसआयटीकडे सुपूर्द केल्यामुळे या संदर्भातील माहिती एसआयटीकडे दिली असल्यामुळे अधिक माहिती त्यांच्याकडून मिळेल, असे सांगितल्यानंतर अंधारे यांनी एसआयटी प्रमुखांची काल दुपारी भेट घेतली. यावेळी त्यांनी नाशिक शहरातील काही पोलीस अधिकारी व लोकप्रतिनिधी संदर्भात माहिती देत पुरावे सादर करून चौकशीची मागणी केली आहे. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर, शिवसेना शिंदे गटाचे मंत्री दीपक केसरकर यांच्याबद्दलही तक्रारी केल्या असून काही पुरावे सादर केले आहेत व या दोघांची बारकाईने चौकशी करावी, अशी मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेनेच्या शालिमार चौकातील मध्यवर्ती कार्यालयात काल दुपारी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सुषमा अंधारे यांनी मंत्री दीपक केसरकर, रुपाली चाकणकर आणि अशोक खरात यांच्यात साखळी असल्याचा आरोप करत या तिघांचे मागील काळातील फोन रेकॉर्ड तपासण्याची मागणीही त्यांनी केली.

अंधारे आणि राष्ट्रवादी (सुनेत्रा पवार गट) नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांची भेट घेऊन चाकणकर यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी काही छायाचित्रे सादर करत संबंधितांच्या भेटी आणि बैठकींचा उल्लेख केला. अंधारे यांनी भाजप नेते व मंत्री अतुल सावे आणि शिंदे सेनेचे माजी खासदार हेमंत गोडसे यांचेही अशोक खरातसोबतचे फोटो दाखवत हा भस्मासूर कोणी पोसला? असा सवाल उपस्थित केला. याशिवाय, अंधारे यांनी रुपाली चाकणकर आणि सुनील तटकरे यांच्यातील कथित आर्थिक संबंधांवरूनही प्रश्न उपस्थित केले. चाकणकर यांचे पती नीलेश चाकणकर आणि चौधरी नावाच्या व्यक्तीची कोकणातील एका प्रकल्पात भागीदारी असून तो प्रकल्प ४५० ते ५०० कोटी रुपयांचा असल्याचा दावा त्यांनी केला. (पान ६ वर)

## नीट व जीसाठी दोन वर्षांचे निवासी नि:शुल्क,

### विद्यार्थ्यांसाठी 'सुपर १००' अंतर्गत कोचिंग अर्ज करण्याचे आवाहन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- जिल्हा परिषदेच्या वतीने ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'सुपर १००' उपक्रमांतर्गत NEET d JEE/ Advance परीक्षांसाठी दोन वर्षांचे निवासी व पूर्णतः नि:शुल्क कोचिंग उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उपक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांनी निवड चाचणीसाठी ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड (NEET + JEE) करण्यात येणार असून त्यामध्ये एससी १४, एसटी ३६ व इतर ५० असा संवर्गनिहाय समावेश असेल. तसेच या १०० विद्यार्थ्यांमध्ये २ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीही विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. ही निवड प्रक्रिया दोन टप्प्यांत होणार आहे, पहिला टप्पा तालुकास्तरावर होणार असून त्यातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीनुसार अंतिम टप्पा, जिल्हास्तरावर होईल. निवड चाचणी परीक्षा ही इयत्ता १० वी अभ्यासक्रमावर आधारित असून १०० गुणांची असेल. परीक्षेत भौतिकशास्त्र (२०), रसायनशास्त्र (२०), गणित (२५), जीवशास्त्र (२०) व इंग्रजी (१५) या विषयांचा समावेश असेल. परीक्षेसाठी १२० मिनिटांचा कालावधी राहील. सदर परीक्षेला बसण्यासाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत दि.१२ एप्रिल रोजी रात्री १२ वाजेपर्यंत असणार आहे व प्राथमिक निवड चाचणी परीक्षा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. या उपक्रमासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील प्रमुख बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे : विद्यार्थी नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शासकीय, अनुदानित, अंशतः अनुदानित शाळेतून इ.१० वी (मार्च २०२६) परीक्षेस प्रविष्ट असावा. निवड झाल्यानंतर इ.१० वी उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक सादर करणे बंधनकारक राहील, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेत प्रवेश घेणे आवश्यक राहील.,पालकांचे वार्षिक उत्पन्न कमाल २ लाख रुपये असावे, अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल) सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दोन वर्षे निवासी पद्धतीने प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च, पुस्तके, अध्ययन साहित्य व निवास व्यवस्था पूर्णतः नि:शुल्क उपलब्ध करून दिली जाईल, त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर जाऊन अथवा खालील लिंक, क्यु आर कोडचा उपयोग करावा, अशी माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा नोडल अधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी दिली.

## सिंहस्थातील विकासकामांना मंत्री गिरीश महाजन यांची अचानक भेट

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक शहरात आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विकास कामांना गती देण्यात येत असून कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक दौऱ्यादरम्यान काल अचानक सायंकाळी शहरातील महत्त्वाच्या विकास कामांची पाहणी करून कामांच्या गुणवत्तेबाबत कडक निर्देश दिले.



शासन व प्रशासन 'ॲक्शन मोड' मध्ये कार्यरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मंत्री महाजन यांनी स्पष्टपणे सांगितले की, रस्त्यांच्या कामांमध्ये कोणत्याही प्रकारची कुचराई सहन केली जाणार नाही. शहरातील नागरिकांना दीर्घकाळ टिकणारे, अत्यंत दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी प्रशासन व संबंधित ठेकेदारांनी प्रामाणिकपणे काम करावे. कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण राखले जावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

मंत्री महाजन यांनी नाशिक शहरातून त्र्यंबकेश्वरकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या मार्गांपैकी गरवारे पॉईंट ते अंबड लिंक रोड या रस्त्याच्या कॉँक्रिटीकरण कामाची पाहणी केली. हा मार्ग कुंभमेळ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, वाहतूक सुलभतेसाठी या कामाला प्राधान्य दिले जात आहे. तसेच त्र्यंबक नाका परिसरातील जिल्हा रुग्णालया समोरील कॉँक्रिटीकरणाच्या (व्हाईट टॉपिंग) कामाचीही त्यांनी पाहणी केली. या ठिकाणी कामाची गती, दर्जा आणि नियोजन याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. तसेच कॉँक्रिटीकरणासाठी आवश्यक खडी, सिमेंट व इतर साधनसामग्रीही उच्च दर्जाची असावी, याबाबत आवश्यक ते निर्देश त्यांनी दिले. या पाहणी दौऱ्यावेळी महापौर हिमगौरी आहेर-आडके, महापालिका स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल, संदेश शिंदे, कार्यकारी अभियंता (मनपा), तसेच उपकार्यकारी अभियंता निलेश साळी यांच्यासह महापालिका व प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### वेगाने अन् काटेकोरपणे काम पूर्ण करण्याचा संदेश

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात रस्ते, पायाभूत सुविधा आणि नागरी सोयीसुविधांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. या कामांची वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्तता करण्यासाठी शासनस्तरावरून सातत्याने आढावा घेतला जात आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या या पाहणीमुळे संबंधित यंत्रणांना अधिक वेगाने व काटेकोरपणे काम पूर्ण करण्याचा स्पष्ट संदेश मिळाला आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : गोष्टी वेळच्या वेळी करा. नातेवाईक अडचणी निर्माण करतील. कामात दुर्लक्ष करू नका.
- **वृषभ** : इतरांवर प्रभाव पाडाल. नोकरीत उत्तम घडामोडी घडतील. मानसिक ताण कमी होईल.
- **मिथुन** : काळजीमुळे झोपेचं खोबरे होईल. ज्येष्ठ अडचणी वाढवतील. दिलेला शब्द पाळावा लागेल.
- **कर्क** : सुखाचे क्षण अनुभवाल. मोठी गुंतवणूक करण्याची संधी. संततीचे हट्ट पूर्ण करणं गरजेचं ठरेल.
- **सिंह** : आर्थिक व्यवहारात सावध राहावे. मर्यादा ओलांडू नका. महत्त्वाच्या कामांना प्राधान्य द्या.
- **कन्या** : नोकरीत कौतुकाचे क्षण अनुभवाल. पर्यटनाची संधी साधाल. प्रगतीपथावर वाटचाल कराल.
- **तूळ** : महत्त्वाची कामं पुढे ढकलावीत. भावंडांना मदत करावी लागल्यामुळे आर्थिक चणचण जाणवेल.
- **वृश्चिक** : गुणांची झलक दाखवाल. पैशाची उपलब्धता राहील. तुमच्या मेहनतीचं चीज होईल.
- **धनु** : कौटुंबिक वादात पडू नका. व्यसनापासून सावध रहा. कोणावरही अवलंबून राहू नका.
- **मकर** : खर्चावर नियंत्रण ठेवा. बेफिकीर वृत्ती टाळावी. अपरिचित लोकांवर विश्वास टाकू नका.
- **कुंभ** : तुमची पत आणि प्रतिष्ठा वाढेल. अचानक धनलाभाचा योग. सार्वजनिक कार्यात भाग घ्याल.
- **मीन** : प्रगतीतले अडथळे दूर होतील. पती-पत्नीमधील मतभेद दूर होतील. प्रवासाचा आनंद घ्याल.

ब्युटी टॉक

## लिपस्टिकच्या भन्नाट शेड्स

लिपस्टिकशिवाय कोणताही मेक अप पूर्ण होत नाही. भारतीय महिला सर्वसाधारणपणे लाल आणि गुलाबी शेडच्या लिपस्टिक्सना पसंती देतात. मात्र वेगळा लूक मिळवण्यासाठी तुम्ही हटके रंगाच्या लिपस्टिक्स ट्राय करू शकता. आधी फारशा न वापरल्या गेलेल्या शेड्सच्या या लिपस्टिक्सचा समावेश तुमच्या मेक अप किटमध्ये करायला हवा.

* २०१६ च्या 'कान्स फिल्म फेस्टिवल'मध्ये ऐश्वर्या रायने लावलेली पर्पल रंगाची लिपस्टिक चर्चेचा विषय ठरली. पर्पल हा उन्हाळी रंग असला तरी ही शेड खूप कमी महिलांवर शोभून दिसते. गोऱ्या महिला पर्पल लिपस्टिक लावू शकतात. पांढऱ्या रंगाच्या पेहरावावर ही शेड छान दिसेल.

* ब्राउन रंगालाही खूप कमी पहिला पसंती देतात. मात्र या शेडमुळे तुम्ही बोल्ड आणि ब्युटीफुल दिसता. (क्रमश:)

## २८ मार्च

दिनविशेष

- **२०१५** : 'आयआयएनएसएस-१ डी' उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण.
- **२०१६** : कोळसा खाण गैरव्यवहारात रुंगठा बंधूंना केंद्रीय अन्वेषण विभागाच्या विशेष न्यायालयाने दोषी ठरवलं.
- **२०१७** : तूर्तास लोकपालांची नियुक्ती करणं अशक्य असल्याची भूमिका केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात मांडली.
- **२०१८** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या गणित आणि अर्थशास्त्र या विषयाच्या परीक्षा पुन्हा होणार असल्याचं जाहीर.

स्मार्ट टिप्स

## फोन स्लो होतोय?

फोन स्लो होण्याची बरीच कारणं आहेत. जास्त एमबीची ॲप्स हे त्यामागचं महत्त्वाचं कारण. फोन स्लो करणारी ॲप्स कशी ओळखायची याबाबतच्या काही टिप्स....

* सर्वसाधारणपणे फेसबुक, इन्स्टाग्रामसारखी ॲप्स जास्त बॅटरी किंवा रॅम वापरतात. बॅटरी खाणारी इतरही बरीच ॲप्स असतात. * या ॲप्सबद्दल जाणून घेण्यासाठी सर्वात आधी सेटिंग्जमध्ये जा. यातल्या स्टोरेज/मेमरीवर क्लिक करा. * इथे एक यादी तुमच्यासमोर येईल. त्यात सर्वात जास्त स्पेस वापरणाऱ्या ॲप्सची नावं असतील. फोनमधल्या इंटरनल स्टोरेजची माहितीही यात असेल. * यानंतर मेमरीवर टॅप करा. मग मेमरी युज्ड बाय ॲप्स हा पर्याय निवडा. * इथे तुम्हाला ॲप युसेजची माहिती मिळेल. कोणतं ॲप किती टक्के रॅमचा वापर करतंय याची नोंद इथे ठेवलेली असते. * सर्वात जास्त रॅम वापरणारी ॲप्स तुम्ही किल करू शकता किंवा अनइंस्टॉल करू शकता. फारशी वापरात असलेली ॲप्स सरळ डिलिट करून टाका. * फोनची मेमरी फुल झाली असेल तर फोन स्लो होण्याची शक्यता असते. त्यामुळे फोन मेमरी थोडी फ्री ठेवा.

### पंचांग

**शनिवार, २८ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, चैत्र शु. १०, चंद्रराशी : कर्क, नक्षत्र : पुष्य, योग : सुकर्मा, सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.४९

### फॉरवर्ड्स

**कहनें क़ो ज़िन्दग़ी थीं बहुत मुख़्तसर मग़र...**

**कुछ यूँ बसर हुई क़ी ख़ुदा याद आ ग़या...!**

गप्पांचा कोपरा

## मन मोकळे करा

मित्र-मैत्रिणींबरोबर आपण मनातले विचार शेअर करत असतो. पण शेवटच्या वेळी तुम्ही तुमच्या वैयक्तिक गोष्टी मित्रासोबत कधी शेअर केल्या होत्या? यानंतर तुम्हाला कसे वाटले? ते योग्य वाढले की बोलल्यानंतर पश्चात्ताप झाला? याचे उत्तर द्या पाहू. न्यूयॉर्क टाइम्सने विद्यार्थ्यांना यासंबंधी असेच काही प्रश्न विचारले. यावर अनेक विद्यार्थ्यांनी सांगितले की, त्यांना मित्र-मैत्रिणींना मनातले सांगणे अवघड जाते. खरंच, आपल्या भावना व्यक्त करताना असुरक्षित वाटणे ही एक स्थिती असून ती नाहिशी झाली तर आपल्याला नातेसंबंध निर्माण करण्यात आणि ते अधिक घट्ट करण्यात मदत होऊ शकते. परंतु प्रत्येकालाच ते जमतेच असे नाही.



अनेकांना सर्वात मोठी भीती ही असते की, वैयक्तिक गोष्टी बाकींच्या गप्पांचा विषय बनू शकतील. अशा परिस्थितीत ते काहींना ओझे वाटू शकतात. त्यामुळे ते त्यांचे विचार शेअर करण्यास कचरतात. मात्र, गोपनीय गोष्टी शेअर केल्याने जवळीक वाढते ही सकारात्मक बाब आहे. मोकळेपणाने बोलल्याने एकटेपणा कमी वाटतो. मित्रांना वैयक्तिक किंवा काहीतरी महत्त्वाचे सांगितले जाते तेव्हा ते काही काळासाठी तरी माहिती गुप्त ठेवतात. बरेचजण आपल्या मित्र अथवा मैत्रिणीला त्या स्थितीतून, चिंतेतून, समस्येतून बाहेर काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. त्याला मानसिक आधार देतात. त्याची काळजी घेतात. आपल्या अडचणीत असणाऱ्या मित्र-मैत्रिणीच्या संपर्कात राहण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. म्हणूनच जवळच्या मित्र-मैत्रिणींवर विश्वास ठेवा आणि त्यांच्यासमोर मन मोकळे करा.

### वेगळ्या वाटा

व्हिडिओ, ऑडिओ बुक्स, पॉडकास्टिंग तसंच इतर माध्यमांमुळे व्हॉईस ओव्हर आर्टिस्टना भरपूर काम मिळू लागलं. ऑनलाईन लर्निंग व्हिडिओजनाही आवाज द्यावा लागतो. ॲनिमेशनचं क्षेत्र तर व्हॉईस ओव्हर आर्टिस्टची वाट बघत असतं. जाहिराती, माहितीपट, लघुपट विविध भाषांमध्ये जातात. मल्टीमीडियातही आवाजाला महत्त्व आहे. व्हॉईस ओव्हर आर्टिस्टकडे अभिनयकौशल्य असावं लागतं. आवाजाच्या माध्यमातूनच त्याला आपल्या भावना पोहोचवायच्या असतात. त्यामुळे अभिनयाचं प्रशिक्षण घेता येईल. आवाजाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करता येतील.

कार अँड बाईक

## कार ठेवा चकाचक

आरामशीर प्रवासासाठी बरेच युवक कारला प्राधान्य देतात. स्वत:च्या कारमधून प्रवास करण्याची शानचं वेगळी असते. मात्र कारची स्वच्छता ही एक कटकटीची बाब ठरते. स्वच्छतेचे निकष पाळले नाहीत तर कारमध्ये दुर्गंध येतो. प्रदुषित हवेमुळे घुसमटल्यासारखं वाटतं. या समस्या सोडवण्यासाठी कार आयोनायझर सोबत ठेवा. यामुळे ताजेपणाची अनुभूती मिळू शकेल. * कारमध्ये धूम्रपान केल्यानंतर धूर आणि वास भरून राहतो. त्याचा प्रभाव दूर करण्यासाठी कारमध्ये छानसा परफ्युम स्प्रे करा. * कधीकधी कारच्या एसीमधूनही वेगळा वास येऊ लागतो. अशा वेळी कार एसी क्लीनरचा वापर करू शकता. कार एसी क्लीनरमुळे चांगला गंध येतोच शिवाय जंतूही मरून जातात. अँटीबॅक्टेरियल क्लीनर निवडा. * कारच्या सीटमध्ये तसंच इतर ठिकाणी साठलेली धूळ काढून टाकण्यासाठी छोटा व्हॅक्युम क्लीनर मिळतो. या व्हॅक्युम क्लीनरमुळे आतली धूळ निघून जाते आणि कार चमकू लागते. * कार स्वच्छ करण्यासाठी घरातला कपडा न वापरता मायक्रोफायबरचं कापड वापरावं लागतं. यामुळे कारवर स्क्रॅचेस पडत नाहीत आणि ती नवी कोरी दिसते.



खेचाखेची

## पैशाचे लाड

**मुलगा** : काका, कुल्फी कितीला आहे?

**कुल्फीवाला** : ३० रुपयांना..

.

मुलगा कुल्फी खातो, आणि घरी जायला निघतो.

.

**कुल्फीवाला** : अरे, पैसे दे की!

.

.

**मुलगा** : आमच्या घरचे म्हणतात, खा, प्या मजा करा... पण पैशाचे लाड नाही!

### वेगळं काही

अमेरिकेत राहणाऱ्या ७१ वर्षांच्या रोजा फेरिंगो यांनी ३१० प्लास्टिक पिशव्यांचा वापर करून जॅकेट आणि स्कर्ट तयार केला आहे. यासाठी त्यांना दोन महिने लागले. लांबून बघितलं तर हा ड्रेस कपड्यापासून बनवला आहे, असंच वाटतं. हात लावल्यानंतरच तो प्लास्टिकचा असल्याचं कळतं. प्लास्टीकचा पुर्नवापर करून बनवलेली पर्स बघून अशाप्रकारे ड्रेस तयार करण्याची कल्पना सुचल्याचं फेरिंगो सांगतात. प्लास्टिकच्या पिशव्यांपासून ड्रेस तयार करण्यासाठी फेरिंगो यांनी एका दुकानातून लाकडं खरेदी केली. ती तासून त्याचं रुपांतर सुईमध्ये केलं. प्लास्टिक पिशव्या गोळा केल्या. त्यातल्या १७० पिशव्यांपासून जॅकेट आणि १४० पिशव्यांपासून स्कर्ट तयार केला.

फॅशन पॅशन


## बाह्यांचे आकर्षक पॅटर्न्स

विविध धाटणीचे पेहराव शिवून घेताना बाह्यांमधील वेगळेपण लक्ष वेधून घेतं. वेगवेगळ्या प्रकारे बाह्या शिवून घेता येतात. अर्थातच यावेळी आपला कम्फर्ट आणि पेहरावाचा एकूण बाज लक्षात घ्यायला हवा. बाह्यांच्या स्टाईलमध्ये प्रयोग केले असता स्टायलिश लूक मिळतो शिवाय चांगला फीलही मिळतो. बाह्यांच्या अशा काही पॅटर्न्सवर नजर टाकू या...



* भारतीय पारंपरिक पेहरावामध्ये 'रफल स्लीव्हज' हा प्रकार शोभून दिसतो. ब्लाऊज, कुर्ते तसंच चोलीमध्ये अशा स्लीव्हजचा वापर केला जातो. रफल स्लीव्हजमुळे विशेष प्रसंगी घालायच्या कपड्यांची रंगत वाढेल. * सध्या 'बेल स्लीव्हज' हा प्रकारही लोकप्रिय ठरत आहे. या स्लीव्हज पुढच्या बाजूने ढगळ असतात. पण बारीक हाताच्या युवतींनी बेल स्लीव्हज कॅरी करणं टाळावं. * 'लाँग केप स्लीव्हज'चा ट्रेंडही भरात आहे. * पूर्ण बाह्यांमध्ये 'बॉक्सी स्लीव्हज'ची लोकप्रियता वाढली आहे. पाश्चिमात्य पेहरावांवर स्लीव्हजचा हा प्रकार खुलून दिसतो. या स्लीव्हज खालच्या बाजूने फुगीर असतात. हात जाड असतील तर अशा स्लीव्हज कॅरी करता येतील.

## शब्दकोडे क्रमांक २१८२



**आडवे शब्द :-**
१) मन, अंत:करण
४) थोडासा
६) अर्धवर्तुळाकार
१०) सोन्याचा धागा
११) हत्तींचा राजा
१३) शुभ्र, पांढरे
१४) वाळा
१५) अभिनेता
१६) आवाज, ध्वनी
१७) मुळाक्षरे
१८) झाडाची पाने
१९) च्या सह
२१) जाळ्या, चित्रे यांचे खोदलेले काम
२४) मायावी, कपटी, चापल्य, आश्चर्यजनक
२६) वडील
२७) वणवा, जंगलाला लागलेली आग
२९) खोकला, आचोळ
३०) आंबट-गोड चवीचे एक कातेरी कंद
३२) हिन्दीत दु:ख
३४) कुलीन
३५) धमकी
३७) सख्खा भाऊ
४०) च्या जवळ
४१) कारखान्याचा मालक
४४) शरीर
४६) रात्रभर
४८) साप्ताहिक सुट्टीचा दिवस
५०) ढीग
५१) पृथ्वी
५३) मोठा चाकू, दारु
५४) यज्ञ
५५) अर्णव
५७) तालुक्याचे वसुलाचे काम
६०) संताप
६२) रामाला उष्टी बोरे देणारी
६४) संयुक्त विचार
६६) पूर्ण नाश, नेस्तनाबूत
६८) नातेवाईक
७०) लेखणी
७१) अफवा
७२) तापट, संतापी
७३) मनाचा ओढा.

**उभे शब्द :-**
१) डोळ्याला सुरमा लावण्याची धातूची काडी
२) पोत्याचे कापड
३) नक्र
४) वृद्धत्व, थोडासा
५) राजाचा राज्य करण्याचा कालावधी
६) कमळाप्रमाणे सुंदर डोळ्याची
७) सामान
८) प्रमाणपत्र
९) द्रवपदार्थ
१२) एक गळीत धान्य
१३) हवाईअड्डा
१८) कबूतर
१८अ) दही घुसळण्याचे साधन
२०) गीत
२२) मोठा भाऊ
२३) तांदळाची एक जात
२५) भरपूर, पुष्कळ
२८) शहर, गाव
३०) अभिनेता
३१) दृष्टी
३२) निवासस्थान
३६) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३८) नकारच्या विरुद्ध
३९) करुणा,कीव
४०) मर्यादा
४२) लोकसंख्येची मोजणी
४३) यम किंवा कर्ण, सूर्याचा मुलगा
४५) सेवक, गुलाम
४७) योगी, मंत्रतंत्रादी साधन करणारा
४९) वाहणारी हवा, मरुत
५०) नमस्काराचा एक शब्द
५२) पवित्र घर
५६) कमरपट्टा, दोरी
५८) निकट
५९) उपकार
६१) भूतकाळ
६३) आजीबाईची थैली
६४) दोन नद्या एकमेकात मिसळून जाणे, मीलन
६५) नाकावरील मोत्याचा दागिना
६६) घोड्याच्या पायाखाली लावलेली अर्धचंद्राकृती लोखंडी पट्टी
६७) मृत्युदेवता
६८) कापडी बंद
६९) वल्लरी.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईजचे अधिवेशन संपन्न




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप सी व नॅशनल युनियन ऑफ पोस्टल एम्प्लॉइज पोस्टमन व एम. टी. एस., नाशिक विभाग, नाशिक या पोस्ट खात्यातील मान्यताप्राप्त युनियनचे संयुक्त द्वैवार्षिक अधिवेशन हॉटेल सेलेब्रिटा अंधशाळा स्टॉप, नाशिकरोड येथे वर्ग-३ शाखेचे अध्यक्ष आशुतोष देशपांडे व पोस्टमन एम. टी. एस. युनियनचे अध्यक्ष अनिल जगताप यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडले.

सभेस प्रमुख पाहुणे म्हणून सुनील झुंजारराव, संतोष कदम, महादेव गोपाळघरे, आर. डी. म्हस्के, बी. एन. वाघ संस्थापक सदस्य नाशिकरोड हे उपस्थित होते.

शाखेचे सचिव चेतन अपेट यांनी सभेस मागील द्वैवार्षिक सभेचे इतिवृत्त वाचले. सन २०२६-ते २०२८ सालासाठी नवीन पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्ष आशुतोष देशपांडे , उपाध्यक्ष प्रमोद आहेर, सेक्रेटरी चेतन अपेट, असि.से. कैलास गायकर,माहेश्वरी रौंदळ, रमेश भोर, प्रदीप पवार, ट्रेझरर प्रवीण बिडवे, प्रज्ञेश गांगुर्डे, अमित बल्लाळ, हरिष चव्हाण, जितेंद्र लोहार, अक्षता कामत, मोनिका अगरवाल, ऑडिटर वाय. एस. शिंगणापूरक, संतोष कदम.

सर्कल सेक्रेटरी व श्री महादेव गोपाळघरे यांनी सर्कल स्तरावरील चाललेल्या कामकाजाची माहिती दिली. आर. डी. म्हसके यांनी कार्यक्रमात कमी सर्व्हिसमध्ये श्रीमती सृष्टी मुडेवार यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. राष्ट्रीय स्तरावरील टेबलटेनिस पटू चंदन जाधव यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माहेश्वरी रौंदळ यांनी केले, आभार कैलास गायकर यांनी मानले.

## २ एप्रिल रोजी हनुमान केसरी स्पर्धा

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी)** :- हनुमान जयंतीनिमित्त २ एप्रिल रोजी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हर्षवर्धन सद्गीर हे प्रमुख पाहुणार असल्याची माहिती अनिल ढेरिंगे यांनी दिली.

सभी शुभअंक संख्याशास्त्र, अंकशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

शनिवार
२८/३/२०२६
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ५ | ८ | ९ |
| २५८ | २६० | १२६ |
| ४४७ | ५६७ | २८९ |
| ५७ | ८४ | ९५ |
| ५९ | ८६ | ९७ |

## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभू ज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# 'सियावर रामचंद्र की जय'च्या गजरात अवघा जिल्हा दुमदुमला

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** श्रीराम जयराम जय जयराम, जय श्रीरामच्या घोषणांनी नाशिक जिल्हा व शहर दुमदुमले होते. अनेक राममंदिरांमध्ये श्रीरामनवमी साजरी करण्यात आली. यावेळी महाआरतीबरोबरच महाप्रसादांचेही आयोजन करण्यात आले होते. अनेक ठिकाणी सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले.



## रामनगर येथील श्रीराम मंदिरात रामजन्मोत्सव उत्साहात

रामनगर, विनयनगर येथील श्रीराम मंदिरात रामनवमी जन्मोत्सव अतिशय मंगलमय व भाविक वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी पूजा झाल्यानंतर दुपारी रामजन्माचा पाळणा म्हणून प्रभू रामचंद्रांच्या जन्माचा आनंद व्यक्त करीत जन्म सोहळा साजरा करण्यात आला. सीतावल्लभ बहुउद्देशीय संस्थेतर्फे येथील श्रीराम मंदिरात 'सियावर रामचंद्र की जय' आणि 'जय श्रीराम'च्या जयजयकारात श्रीरामनगर, विनयनगर आणि दीपालीनगर परिसर सजविण्यात आल्याने परिसरात आनंदाचे उत्साहाचे भावभक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

परिसरातील रामभक्तांनी पारंपरिक वेशभूषा करून रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. यानिमित्त श्रीरामनवमीच्या पूर्वसंध्येला सवाद्य पालखी मिरवणुकीला स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या विशेष पालखी सोहळ्याला मार्गावर ठिकठिकाणी सडा रांगोळी, कुंकुमार्चन करून पालखीवर पुष्पवृष्टी करीत स्वागत करण्यात आले. मिरवणूक मार्गावर टाळ-मृदंगाच्या गजरात भाविक तल्लीन झाले होते. भजन-कीर्तनाच्या सुरावटींमुळे अवघा परिसर राममय झाला होता. यावेळी नगरसेविका रूपाली निकुळे, मंगला नन्नावरे, माजी नगरसेवक यशवंत निकुळे, प्रकाश नन्नावरे, संजय गिते, सचिन गुलाटी, प्रवीण सोनार, ज्ञानेश्वर मेतकर व ओमकार जगळे यांच्यासह अनेक मान्यवरांसह भाविक सहभागी झाले होते. रामजन्मोत्सवाच्या निमित्ताने दर्शनासाठी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले, तसेच स्वयंसिद्ध महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. 'स्वये श्री रामप्रभू ऐकती कुश लव रामायण गाती...' या गीताबरोबरच श्रीराम जन्मानिमित्त गीतरामायणाचा कार्यक्रम गायक विवेक केळकर व सहकाऱ्यांनी सादर केला. रात्री उशिरापर्यंत रामभक्तांनी मंदिरात रांगा लावून प्रभू रामाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती.

## नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशन



नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने आयोजित रामनवमी विशेष सायकल राईडची सुरुवात सकाळी ६.३० वाजता जेहान सायकल येथून श्रीरामाच्या जयघोषात करण्यात आली. ही राईड जेहान सर्कल ते गंमतजंमत असा प्रवास करीत पुढे भोसला शाळेतील श्रीराम मंदिर येथे भक्तिमय वातावरणात पार पडली.

सर्व सायकलिस्टांनी श्रीरामाचे दर्शन घेतले आणि एकत्रितपणे भजन गात संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून टाकला. नादातून यां नाद निर्मिती, श्रीराम जय राम जय जय राम हे भजन माधुरी गडाख यांच्या पाठोपाठ सर्व सायकलिस्टांनी उत्स्फूर्तपणे गायले. या प्रसंगी अध्यक्ष अमित नारायण घुगे, उपाध्यक्ष दविंदर सिंग भेला, संचालिका माधुरी गडाख, संचालक कारभारी भोर, शुभम् भालेराव, तसेच अनेक सायकलिस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये श्रीरामाचा जयघोष

प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडियम स्कूल पाथर्डी फाटा येथे रामजन्मोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. सरस्वतीपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रकाश कोल्हे, संस्था सचिव ज्योती कोल्हे, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेत रामनवमी उत्साहात साजरी झाली असून, विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय झाले.

रामनामाच्या जयघोषाने या सोहळ्यास विशेष रंगत आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व प्रभू रामाच्या नैतिक मूल्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी राम, सीता, लक्ष्मण, हनुमान व शबरी यांची वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना रामायणातील प्रसंग सांगून रामाच्या आदर्श जीवनावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांना सत्य आणि नैतिकतेचा मार्ग शिकविला.

रामनामाच्या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने रामरक्षा पठण व विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.



## देवळालीत महाआरोग्य तपासणी

देवळाली कॅम्प येथे सामाजिक कार्यकर्ते तेजस दीपक बुंदेले यांनी सर्वरोगनिदान शिबिर आयोजित केले होते. यावेळी माजी खासदार हेमंत गोडसे, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे नामनिर्देशित सदस्य सचिन ठाकरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

संतकृपा हॉस्पिटल व साळवे क्लिनिक ॲण्ड आयुर्वेदिक चिकित्सालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आरोग्य तपासणी शिबिरात डॉ. जितेंद्र कोडिकर, डॉ. योगेश कयांडे, डॉ. प्रियंका साळवे आणि डॉ. चेतन साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. यावेळी जवळपास ५० नागरिकांनी रक्तदान केले, तर १०५० नागरिकांनी तपासण्या केल्या.

या कार्यक्रमाप्रसंगी माजी खा. हेमंत गोडसे, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिषेक मणी त्रिपाठी, नामनिर्देशित सदस्य सचिन ठाकरे, पोलिस निरीक्षक श्रीनिवास देशमुख, सुरेश कदम, दीपक बुंदेले, चंद्रकांत गोडसे, सुभाष बोराडे, रमेश शिरसाट, कचरू गोडसे, प्रशांत काळे, नीलेश साळवे, बिट्टू पवार,चंदू साडे, वीरेंद्र जाधव, सलमान खान, यश शिंदे, आशू कनोजिया, अमन रंगारी, नितीन यादव, वासू कंगारे, सचिन गावंडे, सुलतान मन्सुरी, स्वयम् पिसे, नवीन मेना, सन्नी मेंद्रे, रोहित बच्छाव, तसेच गवळीवाडा मित्रमंडळ, मारीमाता मित्रमंडळ, सरकार फाऊंडेशन व साठेनगर मित्रमंडळ यांचे सहकार्य लाभले.



## कोदंडधारी राममंदिरात रामदंडीची मानवंदना

सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीच्या भोसला कॅम्पसमधील कोदंडधारी राममंदिरात रामजन्मोत्सवानिमित्त गुरुवारी भक्तिमय वातावरणात महापूजा पार पडली. यावेळी एनसीसी छात्र, रामदंडी, तसेच रायफल व अश्वपथकाने प्रभू रामचंद्रांना मानवंदना दिली. ढोलपथकाचा निनाद, रामरक्षा, भजन-कीर्तन आणि जयघोषामुळे परिसर दिवसभर दुमदुमला होता.

संस्थेच्या नाशिक विभागाचे कार्यवाह मिलिंद वैद्य व ज्योती वैद्य यांच्या हस्ते राममूर्तीचे सपत्निक अभिषेक-पूजन करण्यात आले. यावेळी सरकार्यवाह सीएमए हेमंत देशपांडे, राममंदिराचे अध्यक्ष नरेंद्र वाणी, सुवर्णा दाबक, जयंत खेडेकर, आसावरी धर्माधिकारी, प्रमोद शिरोडे, शरद शिरोडे आदी उपस्थित होते. रामजन्माच्या वेळी लष्करी दिमाखात मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शिक्षकांनी पाळणा गात उत्सव साजरा केला. रुद्राणी संत यांच्या कीर्तनातून रामजीवनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.



## रक्तदान व आरोग्य शिबिरास प्रतिसाद

श्रीरामनवमीच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत शिवराज्य मित्रमंडळ व शिव मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जाधव संकुल, अशोकनगर येथे रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, सुमारे १३० नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला, तर २५ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे शिवराज्य मित्रमंडळाच्या वतीने श्रीराम नवमी साजरी करण्यात आली. त्यानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरात मधुमेह, रक्तदाब, हाडांची घनता, रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, ईसीजी व नेत्रतपासणी करण्यात आली. अर्पण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर पार पडले. शिव मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. राहुल पाटील, डॉ. राहुल येवले, डॉ. त्रिकोल पाटील यांच्यासह सचिन सोनवणे, महेश ढोरे व रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सायंकाळी माजी नगरसेवक नंदू जाधव यांच्या हस्ते श्रीरामाच्या प्रतिमेची आरती करण्यात आली. यावेळी नाना वाघ, विजय बुरकुल, सुभाष गुंबाडे आदी उपस्थित होते. आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कैलास मोरे, योगेश देसले, नीलेश शिवरामे, अतुल केदारे, रामेश्वर मुचळंबे, राहुल महाले, नितीन खैरनार, आबा पाटील, दीपक उगले, तुषार ढेपले, सागर बिब्बे, सूरज मोरे, महेश बागूल, आदित्य अहिरे आदींसह मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक येथे रामजन्मोत्सव

इंदिरानगर येथील जॉगिंग ट्रॅक चौक येथे सदगुरू शंकर महाराज मंदिर व शिवकेसरी मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रामजन्मानिमित्त आकर्षक राम लक्ष्मण व हनुमान यांच्या मूर्तींचा देखावा सादर करण्यात आला होता. ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

या ठिकाणी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना पाच हजार राजगिरा लाडू व ४० कॅरेट केळीचा प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी उपस्थितांचे स्वागत मंडळाचे अध्यक्ष सर्जेराव चव्हाण यांनी केले. रोहित राऊत, बाजीराव चव्हाण, सागर सांगळे, लक्ष्मीकांत माळवदकर, हर्षल जोगळेकर आदींनी श्रीरामजन्मोत्सव साजरा करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येवला शहरात रामजन्मोत्सव साजरा



श्रीरामजन्मोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, समाजात एकात्मता, सद्भावना आणि संस्कारांची जपणूक करणारा सण आहे. अशा उत्सवांमुळे समाजातील बंधुभाव अधिक दृढ होतो, असे प्रतिपादन माजी खा. समीर भुजबळ यांनी केले. येवला शहरात मोठ्या उत्साहात साजऱ्या करण्यात आलेल्या रामजन्मोत्सव सोहळ्यास माजी खासदार समीर भुजबळ यांनी उपस्थिती लावत आनंद साजरा केला. यावेळी त्यांनी शहरातील भव्य राम जन्मोत्सव मिरवणुकीत सहभाग घेतला, तसेच विविध राम मंदिरांना भेट देऊन भगवान श्रीरामांचे दर्शन घेतले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, शहराध्यक्ष दत्ता निकम, येवला नगरपालिकेचे गटनेते दीपक लोणारी, माजी नगराध्यक्ष बंडू क्षीरसागर, नगरसेवक गोटू मांजरे, नगरसेवक महेश काबरा, नगरसेवक पारुल गुजराथी, नगरसेवक जावेद लखपती, नगरसेवक अमजद शेख, नगरसेवक बंटी परदेशी, ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रा. प्रभाकर झळके, राजेश भांडगे, गुड्डू जावळे, गणेश गायकवाड, निसार शेख, सुनील पैठणकर, प्रवीण पहिलवान, नितीन गायकवाड, समाधान जेजुरकर, भूषण लाघवे, सचिन सोनवणे, दीपक गायकवाड, मलिक मेंबर, पार्थ कासार, नवनाथ थोरात, सौरभ जगताप, प्रा. संतोष राऊळ, समाधान पगारे, दीपक पवार, आदित्य कानडे, नवनाथ पोळ, राकेश कुंभारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व येवलेकर बहुसंख्येने उपस्थित होते. राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने येवला शहरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीत पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, विविध देखावे, भगव्या पताकांनी सजलेले वातावरण आणि श्रीरामाच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या उत्साही वातावरणात समीर भुजबळ यांनी सहभागी होत नागरिकांशी संवाद साधला व सर्वांना श्रीरामनवमीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी खासदार समीर भुजबळ यांनी शहरातील प्रमुख राम मंदिरांना भेट देत मनोभावे दर्शन घेतले, तसेच मंदिर परिसरातील व्यवस्था, भक्तांची उपस्थिती व आयोजनाची पाहणी केली. विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.



## मंदिरात भाविकांची गर्दी

येवला येथे वनवासी श्रीराम मंदिर येवला येथे प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव महाभिषेक, प्रवचन भजन व प्रभू रामचंद्रांचा जयघोष करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी श्री प्रभू रामचंद्रांचा महाअभिषेक, मंगेश व सारिका बाकळे, तसेच ज्ञानेश्वर व संगीता नागपुरे यांच्या शुभहस्ते ब्रह्मवृंदाच्या मंत्रघोषाने करण्यात आला. प्रभू श्री रामचंद्रांच्या जन्मावर आधारित प्रवचन ह. भ. प. डॉ. प्रसाद शास्त्री कुळकर्णी यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रवण करण्यात आले. यावेळी मंदिरात प्रभू रामचंद्रांचा जन्मसोहळा अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती.

पाळणागीत संगीता नागपुरे, उषा नागपूरकर, अनिता नागपुरे, मंगल घाटकर, सुभद्रा क्षीरसागर व मोनिका सोरते यांनी गायन केले, तर ओम् गुरुदेव भजनी मंडळाने भजन व रामनामाची धून गायन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले, महाआरती व रामनामाचा जयघोष करून पंजिरी व महाप्रसादाचे वाटप करून जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी माजी खासदार समीर भुजबळ, नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी, माजी आमदार नरेंद्र दराडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती वसंत पवार, नगरसेवक गोटू मांजरे, दत्ता निकम, बाळासाहेब लोखंडे व भगवान लोंढे उपस्थित होते, वनवासी श्रीराम मंदिर पुरातन असल्यामुळे येवला व पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे सायंकाळी दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. यावेळेस गाभारा फुलांनी सजविण्यात आला होता, तर मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

कार्यक्रमासाठी भोपाळ, इंदूर, नाशिक, मुंबई, नागपूर व मथुरा येथून मोठ्या संख्येने भाविक आले होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी माजी नगराध्यक्ष बंडू क्षीरसागर, प्रभाकर झळके, प्रवीण पहिलवान, सुहास घाटकर, ज्ञानेश्वर नागपुरे, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश राजेंद्र नागपुरे, पुरुषोत्तम नागपुरे, राजेश नागपुरे, जयंत नागपुरे, नारायण घाटकर, सुनील नागपुरे, कृष्णा नागपुरे, बाळू नागपुरे, किरण नागपुरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.



## लासलगावला श्रीरामजन्मोत्सव साजरा

लासलगाव येथे राम मंदिर ट्रस्टच्या वतीने श्रीरामजन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त कीर्तन आयोजित करण्यात आले होते. या कीर्तनासाठी परिसरातील भजनी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लासलगावचे पोलीस अधीक्षक दीपक पाटील यांच्या हस्ते श्रीरामजन्मोत्सवाच्या वेळेस महाआरती करण्यात आली. या आरतीमध्ये लासलगाव परिसरातील भाविक बंधू-भगिनी सहभागी झाले होते या महाआरतीच्या वेळेस प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदमून गेला होता. यावेळेस संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. उपस्थित भाविक भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्रीरामजन्मोत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्रीराम मंदिर ट्रस्ट लासलगावचे अध्यक्ष अशोक होळकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. युवराज पाटील, सुरेश वडनेरे, विष्णू निकम, कवीप्रकाश होळकर, नानासाहेब पाटील, भरत पाटील, सौरभ पाटील, तसेच लासलगाव ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य सी. एस. पाटील, एस. आर. शिंदे, अरविंद देसाई, भरत वडनेरे, शिवाजी होळकर, तसेच अग्निहोत्री, जितू गुरव व परिसरातील नागरिक व बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सायंकाळी भव्य शोभायात्रा, हनुमान चालीसा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले

## नाशिकरोड येथे रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रा



नाशिकरोड येथे भगवे ध्वज हातात घेऊन 'सियावर रामचंद्र की जय! जय श्री राम....' श्रीरामाच्या जयघोषात अवघे नाशिकरोड दुमदुमून गेले. निमित्त होते रामनवमी उत्सवाचे, आणि त्यानिमित्त सकल हिंदू समाजाच्या वतीने काढण्यात आलेल्या भव्य श्रीराम रथाच्या शोभायात्रेचे. धार्मिक उत्साह, पारंपरिक संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविणाऱ्या या मिरवणुकीला शहरातील नगरसेवक तसेच सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरिकांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला.

मुक्तिधाम येथून सायंकाळी शोभायात्रेला प्रारंभ झाला. धनुर्धारी श्रीरामांची भव्य मूर्ती रथावर विराजमान होती. आकर्षक देखावे, जिवंत चित्ररथ, तसेच विविध सामाजिक व धार्मिक संदेश देणाऱ्या सादरीकरणांनी यात्रेला वेगळे स्वरूप प्राप्त झाले. रामनगरी ढोल-ताशा पथकाच्या गजराने वातावरण भारावून गेले होते.

यात्रेत आदिवासी बांधवांनी सादर केलेल्या पारंपरिक नृत्यांनी विशेष रंगत आणली. लहान मुलांनी सादर केलेले शिवकालीन मर्दानी खेळ आणि छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांच्या वेशातील कलाकारांनी उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी ठिकठिकाणी फुलांची उधळण करत यात्रेचे स्वागत केले.

ही शोभायात्रा बिटको चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, सुभाष रोड मार्गे पुन्हा मुक्तिधाम येथे समारोप करण्यात आला. रात्री आठ वाजता श्रीरामांची भव्य महाआरती करण्यात आली. यावेळी शेकडो भाविकांनी एकत्र येत भक्तिभावाने आरतीत सहभाग घेतला.

शोभायात्रेची सुरुवात पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आली. यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे व जयंत शिरसाठ यांच्यासह मोठा पोलीस फौजफाटा तैनात होता.

धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक वैभव आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवणारी ही भव्य शोभायात्रा नाशिकरोडकरांसाठी अविस्मरणीय ठरली.

## पाथर्डी गाव येथे श्रीरामनवमीनिमित्त लाडूचे वाटप




**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** पाथर्डी गाव येथे श्रीरामनवमीनिमित्त शिवनेरी फाऊंडेशन वतीने श्रीरामांच्या प्रतिमेचे विधिवत् पूजन करून उपस्थित भक्तांना लाडूचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी माजी नगरसेवक सुदाम डेमसे, गंगाधर धोंगडे, तसेच शिवनेरी फाऊंडेशनचे संस्थापक व शिवसेना शाखाप्रमुख दीपक धोंगडे, चेतन कोथमिरे, ओम धोंगडे, प्रशांत जाचक, दत्तात्रेय डेमसे, विठोबा डेमसे, सुनील कोथमिरे, तानाजी गवळी, सदाशिव हुल्लुळे, रामदास गवळी, रामदास जाचक, नामदेव गवळी, कारभारी जाचक, विष्णू डेमसे, देवीदास जाचक, विजय आहेर, विष्णू जुन्नरे, बाळू कोंबडे, शंकर जाचक, सार्थक गवळी, यश जाचक, अनिकेत धोंगडे, अमोल जाचक, गणेश जाचक, आशुतोष गायकवाड, शिवम् खताळे, गौरव कोथमिरे, आदेश शिरसाठ, वैभव धोंगडे, सतीश गवळी, किरण गोवर्धने, संकेत कडभाने, साई गाढवे, प्रथमेश डेमसे, कृष्णा डेमसे यांसह शिवनेरी फाऊंडेशनचे सदस्य व श्रीराम भक्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरात उद्या श्रीराम व श्री गरुड रथयात्रोत्सव

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** काळाराम मंदिर संस्थानाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे श्रीराम नवमी झाल्यानंतर चैत्र शुक्ल एकादशी शके १९४८ रविवारी (दि. २९) सायंकाळी ५.३० वाजता श्रीराम व श्रीगरुडरथाचे आयोजन करण्यात आले असून, श्री काळाराम मंदिर येथून सुरुवात होणार आहे. तरी श्रीरामभक्तांनी रथयात्रा तयारी, गंधलेपन व रसपानासाठी शबरीची बोळ येथील रवींद्र दीक्षित यांच्या निवासस्थानी दुपारी ३.३० वा. जमावे, असे आवाहन श्री अहिल्याराम व्यायामप्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा श्री गरुडरथाचे मानकरी पवन दीक्षित यांनी केले आहे. रथयात्रेसाठी शरदकांत दीक्षित, नंदन दीक्षित, सागर दीक्षित, सुशांत दीक्षित, यज्ञेश दीक्षित, सुरांकित दीक्षित, रुद्रांश दीक्षित व दीक्षित परिवार विशेष परिश्रम घेत आहेत.






# संपादकीय

## जग टाळेबंदीच्या उंबरठ्यावर?

अमेरिका व इस्राइलने इराण युद्धाच्या आडून जगावर इंधन संकट लादल्याचा वाद ऑनलाईन पेटला आहे. जग इंधन संकटाच्या चौकटीवर असल्याचा दावा सुरू आहे. जगातील अनेक देशांमध्ये इंधन संकटाच्या झळा बसत आहेत. मध्य-पूर्वेतील युद्धाने जागतिक ऊर्जा बाजारावर मोठे संकट आणले आहे. जागतिक संस्थांनी इंधन पुरवठ्यावरील निर्बंधाची तुलना मागील काही बंदीच्या नियमांशी केली आहे. त्यामुळे जगात इंधनटंचाईचे संकट दाट होण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. एका वृत्तपत्रातील बातमीचा दाखला देत मध्य-पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जापुरवठा साखळीवर ताण आल्याचे म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने संभाव्य संकटासाठी जगातील देशांना आपत्कालीन शिफारसी केल्या आहेत. या शिफारशींचा एक संच आयईएने देशांना पाठवला असल्याचे या वृत्तात म्हटले आहे. जागतिक ऊर्जा संघटनेने तेलाच्या धक्क्यांपासून बचावाचे उपाय या नावाने शिफारस अहवाल पाठविला आहे. त्यात इंधनाची टंचाई अधिक गंभीर झाल्यास इंधनाचा वापर कमी करण्याच्या दहा उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. त्यात वाहतूक क्षेत्रातील वाहनांचा वापर कमी करण्यावर जोर देण्यात आला आहे. इंधन वापर कमी करण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या आहेत. इंटरनॅशनल एनर्जी एजन्सीने एक महत्त्वाची शिफारस केली आहे. त्यात शक्य असेल तर घरून काम करण्याची सूचना करण्यात आली आहे. महामार्गांवरील वेगमर्यादा ही ताशी १० किमीने कमी करण्याची शिफारस आहे. खासगी वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतुकीच्या वापराला प्रोत्साहन देण्याचाही या शिफारशींमध्ये समावेश आहे. कार-शेअरिंग, सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेचा अधिक वापर, जुन्या वाहनांऐवजी कार्यक्षम वाहनांचा वापर, हवाई प्रवासांवर मर्यादा तर इतर पर्याय शोधण्याची शिफारस करण्यात आली आहे. या शिफारशी समोर येताच समाजमाध्यमांवर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. कोविड-१९ महामारीत लोक जणू घरातच जायबंदी झाले होते. त्यांना बाहेर पडण्यासाठी नियमांचे पालन करावे लागत होते. अवघे जग जणू थांबले होते; पण आता या नवीन संकटावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी आपण या दुसऱ्या टाळेबंदीसाठी आवृत्तीसाठी तयार असल्याचे म्हटले आहे. अर्थात केंद्र सरकारने देशात इंधन संकट नसल्याचे आणि पुरेसा इंधन साठा असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही सोशल मीडियावर लोकांच्या प्रतिक्रिया सुरूच आहेत. इराणकडून होर्मुझ मार्ग बंद करण्यात आल्याने जगातील तेल पुरवठा जवळपास ठप्प झाल्याचे बघायला मिळाले. भारताची या युद्धात भूमिका अगदी स्पष्ट आहे. कोणत्याही स्थितीत युद्ध रोखले पाहिजे, असे भारताकडून वारंवार सांगितले जात आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात फोनवर संवाद दोन दिवसांपूर्वीच झाला. यादरम्यान आता डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक करण्यात आले. संकटाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत मिळून कोणत्याही समस्येतून मार्ग काढू शकतो, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांना अचानक नरेंद्र मोदी यांची आठवण झाल्याने अनेकांनी भुवया उंचावल्या आहेत.

# तुमची रास-आमचा नेम

## दि. २८ मार्च ते ३ एप्रिल २०२६

**शुभमुहूर्त :-** साखरपुडा-३१ मार्च, ३ एप्रिल. डोहाळजेवण-२ एप्रिल. बारसे-३ एप्रिल. जावळ - २, ३ एप्रिल. गृहप्रवेश-२८ मार्च, २, ३ एप्रिल २०२६.

**मेष** सुखाची चाहूल जाणवायला लागेल. व्यापार उद्योग क्षेत्रात फार मोठी नाही; पण जेमतेम परिस्थिती राहील. व्यवसायातील अडचणी कमी होण्याच्या स्थितीत असतील. शेतजमीन व स्थावर मालमत्ता यांचे कागदोपत्री व्यवहार नीट हाताळा. तुमची कागदपत्रे व दप्तर घाई-गडबडीने दुसऱ्याकडे देण्याची घाई करू नका. ते स्वत:च सांभाळून ठेवावे लागणार आहे. घराची स्वप्ने सध्या प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करण्याची सध्या तरी गरज नाही. शुभ तारीख ३०, ३१.

---

**वृषभ** नोकरीत असलेली शांतता कमी होणार आहे. तेव्हा गती वाढवावी लागणार आहे. व्यापार क्षेत्रातसुद्धा बदल होण्याचे संकेत आहेत. धावपळ करून कसर भरून काढताना प्रयत्न वाढवावे लागणार आहेत. भागीदारी व्यवसाय करणाऱ्यांना उत्तम नियोजन साधता येईल व आर्थिक लाभ बऱ्यापैकी होतील. अनियोजित वेळी ठरलेले प्रवास पुढे ढकला. वाहनाचा वेग कमी करा. परिस्थितीचा अंदाज घेणे आवश्यक राहील. द्विधा मन:स्थिती होणार आहे. शुभ तारीख १, २.

---

**मिथुन** नोकरी-व्यवसायात अनुकूल परिस्थिती येईल. त्याचा लाभ घ्या. कमी श्रमात जास्त नफा मिळावे हे ध्येय प्रथमत: बाजूला ठेवा. उद्योगधंद्यात स्वत:च्या विचाराने स्वत: कृती केल्यास त्याचा तोटा न होता फायदाच होणार आहे. दुसऱ्यांवर जबाबदारी देऊन जर काम केले तर पाहिजे तेवढे यश पदरी पडणार नाही. तेव्हा विचाराला प्राधान्य द्या. त्यासाठी वेळ घ्या. मगच कृती करा. दुसऱ्यांबद्दल बोलताना जिभेला आवर घाला. वाईट विचारांना थारा देऊ नका. शुभ तारीख ३०, ३१.

---

**कर्क** कामाच्या ठिकाणी होणारा त्रास कमी होईल. नवीन क्षेत्र अनोळखी असले, तरी जुन्या ओळखीप्रमाणे असल्याची जाणीव होणार आहे. व्यावसायिक क्षेत्रात तुमचा हळूहळू जम बसत जाईल. मित्रांची मदत मिळाल्यामुळे अजून एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न सोडू नका. उणीव भरून काढून समतोल ठेवण्याचा प्रयत्न वाढवा. कामे वेळच्या वेळी करावी लागतील. नोकरी-व्यवसायात आवक वाढविण्याचा कल यशस्वी दिसण्याची चिन्हे दिसू लागतील. शुभ तारीख २८, २९.

---

**सिंह** शांत व धीराने घेतल्यास प्रतिकूलता कमी होण्यास मदत होईल. राहिलेल्या कामाची नोंद घेऊन काम करायला सुरुवात करा. एखादे काम कमी झाले तरी चालेल; पण काम मात्र चोख करा. व्यापारी क्षेत्रात मजा जरी नसली, तरी प्रयत्न करावेच लागतील. संथ गतीने का होईना सुरुवात करावी लागेल. तुमच्या बौद्धिक क्षमतेला चालना द्या. भूलथापांना बळी पडू नका. नवीन वाहन घेण्याचे मनसुबे पूर्ण होण्याच्या मार्गावर असतील. शुभ तारीख ३०, ३१.

---

**कन्या** नोकरीत तुमच्या कामावर वरिष्ठ खूश राहतील. त्याचा लाभ घ्या. जे ठरवता ते पूर्ण होण्याच्या मागे वेळ घालवू नका. कारण वाटचाल करताना ध्येय साध्य होईपर्यंत पुढे चालत राहा. पत्रव्यवहार, लघुलेखन, भाषांतराची कला, वक्तृत्व आदी क्षेत्रांत तुमचे कार्य यशस्वी होईल. अंगच्या कलागुणांना वाव मिळत जाईल. छोटे प्रवास करण्याचे प्रसंग अचानक येऊ शकतात. या सप्ताहात तुमचे आरोग्य उत्तम राहणार आहे. शुभ तारीख १, २.

---

**तूळ** व्यापार, उद्योग यात आवक चांगली राहील. लांबणीवर पडलेली व अडचणीच्या प्रश्नांची मालिका कमी होऊन जाईल. नोकरीत वरिष्ठांनी दिलेली जबाबदारी स्वीकारून चालण्यातच भले आहे हे लक्षात घ्या. नवीन नोकरी मिळविण्यात संघर्ष असला, तरी मिळण्याचे संकेत नाकारता येत नाहीत. तुमच्या कलाकौशल्यांना वाव मिळणार आहे. काहींना उपजत कला असतील, त्या सिद्ध करून दाखविण्याचा वाव मिळेल. कर्तबगारी दाखविण्यास संधी मिळेल. शुभ तारीख ३०, ३१.

---

**वृश्चिक** मागील काही दिवस मानसिक कुचंबणेचे गेले असले, तरी सध्या ती कुचंबणा कमी होण्याच्या मार्गावर असेल. नोकरी असो किंवा व्यवसाय, सध्या पोषक वातावरण असणारे आहे. स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय करण्याची मुभा मिळेल. तो प्रगतीकडे नेणारा असेल. नियोजित कामे वेळच्या वेळी करा. त्यात बदल करणे सध्या तरी टाळावे. नोकरी-व्यवसायातील अडचणी हळूहळू कमी व्हायला लागल्याकारणाने उत्साहदायक व पोषक वातावरण निर्माण होईल. शुभ तारीख २८, २९.

---

**धनू** प्रवासात काळजी घ्यावी. घाबरून न जाता अनावश्यक गोष्टी करणे टाळा. नोकरी-व्यवसायातील पोकळी भरून निघेल. त्यामुळे तुम्ही थोडे शांत राहाल. नवीन नोकरीचा सध्या तरी विचार लांबवा. मित्र-मैत्रिणी यांच्याशी जेवढ्यास तेवढे राहिल्यास गैरसमज होणार नाहीत. शनी-मंगळ युती प्रवासास अनुकूल नसल्याने या सप्ताहातील प्रवास टाळणे उत्तम ठरेल. वाहन जपून चालवा. खर्चाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करा. शुभ तारीख ३०, ३१.

---

**मकर** मोठ्या उद्योगधंद्यात अतिधाडस करणे टाळा. हे तुमच्या हिताचे असेल. नोकरीत झालेले बदल पटकन अंगवळणी पडणार नाहीत. जादा कामाचे नियोजन करावे लागणार आहे. वरिष्ठांनी दिलेल्या नियमांचे पालन करा. त्यासाठी तुमच्या हाताखालील सहकाऱ्यांचे पाठबळसुद्धा चांगले मिळणार आहे. बारीकसारीक गोष्टींचा आढावा घेणे क्रमप्राप्त राहील. कायदा, कोर्टकचेरी व बँक यांच्याही नियमांचे पालन करणे तुमच्यासाठी उत्तम ठरेल. आवक चांगली राहील. शुभ तारीख १, २.

---

**कुंभ** फोटोग्राफी, स्टुडिओ, वादक, फळांचा व्यवसाय अत्तर, कापड, फर्निचर, पेंटर आदी व्यवसाय असणाऱ्यांना हळूहळू गती येईल. कलाकारांना सुयश मिळविण्यासाठी संधी प्राप्त होण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. नवनवीन कला अमलात आणण्याचा तुमचा हेतू सुयशाकडे नेणारा असेल. राजकीय व सामाजिक स्तरावर तुमचे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न यशस्वी ठरेल. मैत्रीला हात देणे तुम्हाला पचनी पडणारे नसले, तरी आश्वासनात अडकू नका. शुभ तारीख ३०, ३१.

---

**मीन** वेळोवेळी प्रयत्नांची परिसीमा गाठूनही मिळण्याची अपेक्षा सोडून द्यावी लागत होती. आता असे न होता भाग्याला कलाटणी मिळण्याचे संकेत तुमच्या समोर येणार आहेत. एखादे मोठे कंत्राट तुमच्या हाती येणार आहे. ज्यांच्याकडून तुम्हाला फार मोठी अपेक्षा नाही, अशा व्यक्तीचेच सहकार्य मिळणार आहे. कलेचे रसग्रहण उत्तम करू शकाल. धार्मिक व परोपकारी वृत्ती राहील. घरगुती वातावरण आनंदी राहील. तुम्हाला भावंडांचे सहकार्य उत्तम मिळेल. शुभ तारीख २८, २९.

# सुकाकाथ मसाला

## बदललेली जागा

कोर्टात काम करणारे दोन वकील होते. त्यांचे एकमेकांशी पटत नव्हते. दोघांपैकी एक जण पुढे न्यायाधीश बनला आणि त्या न्यायाधीशाच्याच पुढे त्याचा दुश्मन असलेल्या वकिलाची केस पुढे आली. कायद्याचा संदर्भ घेताना वकिलाने कायद्याचे पुस्तक न्यायाधीशांपुढे ठेवले.

तेव्हा न्यायाधीश पूर्वीची दुश्मनी लक्षात घेऊन उद्गारला, ''या पुस्तकात ढेकूण आहेत वाटतं!''

तेव्हा वकील ताडकन उद्गारला, ''होय. ढेकूण आहेत. ते बारकडून बेंचकडे गेले आहेत.''

– पानवाला

# खाण्यासाठी चेंज हवा?

## काकडीचे पीयूष

**साहित्य :-** दोन मध्यम काकड्या, अर्धा इंच आले, पाच-सहा पुदिना पाने, एक चमचा लिंबाचा रस, दोन कप गोड ताक, मीठ, मिरेपूड, चाट मसाला, थोडा बर्फ.

**कृती :-** काकडीची साले काढून त्याचे तुकडे करा. मिक्सरमध्ये काकडीचे तुकडे, आले, लिंबाचा रस, साखर, मीठ घालून बारीक करा. नंतर त्यात थंडगार ताक, बर्फ, चाट मसाला व पुदिन्याची पाने बारीक चिरून घाला व थंड करून सर्व्ह करा. ताक शक्यतो घरच्या दह्याचेच वापरा. विकतचे ताक हे मिल्क पावडरीच्या दह्याचे असते. त्यामुळे घरचेच दही व ताक वापरावे.

– ऐश्वर्या राजेंद्र काळे

# चेतक स्क्रीन ॲवॉर्ड्स्

## २४ नामांकनांसह 'धुरंधर' आघाडीवर




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** द इंडियन एक्स्प्रेस ग्रुपच्या 'स्क्रीन अकॅडमी'ने आगामी ५ एप्रिल रोजी होणाऱ्या 'चेतक स्क्रीन ॲवॉर्ड्स'साठी सर्व ३१ श्रेणींमधील नामांकने जाहीर केली आहेत. २०२५ मधील सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट आणि ओटीटी कंटेंटचा गौरव करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

आदित्य धर यांचा स्पाय थ्रिलर 'धुरंधर' २४ नामांकनांसह आघाडीवर आहे, तर मोहित सुरी यांच्या 'सैयारा'ला १७ आणि नीरज घेवान यांच्या 'होमबाऊंड'ला १५ श्रेणींमध्ये नामांकन मिळाले आहे. ही नामांकने थिएटर आणि ओटीटी अशा दोन्ही प्लॅटफॉर्मवरील चित्रपटांसाठी असून, आजच्या भारतीय सिनेमाचे बदलते स्वरूप यातून स्पष्टपणे दिसून येते.

संपूर्णपणे निष्पक्ष आणि केवळ गुणवत्तेवर आधारित प्रक्रिया-१९९५ मध्ये सुरू झालेले 'स्क्रीन ॲवॉर्ड्स' त्यांच्या संपादकीय विश्वासार्हतेसाठी ओळखले जातात. याचे संचलन 'स्क्रीन अकॅडमी'द्वारे केले जाते, जी ५० हून अधिक दिग्गज चित्रपट निर्माते, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंतांची एक स्वतंत्र व विना-नफा तत्त्वावर चालवली जाणारी संस्था आहे. यंदा अकॅडमीच्या ९५ टक्क्यांहून अधिक सदस्यांनी मतदानात सहभाग घेतला. पारदर्शकता जपण्यासाठी 'ऑलिम्पिक पद्धती'चा वापर करण्यात आला, ज्यामध्ये प्रत्येक श्रेणीचे सरासरी ३८-४० तज्ज्ञांनी मूल्यमापन केले. ही प्रक्रिया अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी, युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्निया (यूएससी) च्या 'स्कूल ऑफ सिनेमॅटिक आर्ट्समधील सिनेमा आणि मीडिया स्टडीजच्या अध्यक्षा, प्रोफेसर प्रिया जयकुमार यांनी एक विशेष स्कोअरिंग सिस्टम (रूब्रिक) विकसित केली आहे. याच निकषांच्या आधारे अकॅडमीचे सदस्य चित्रपटांना गुण देतात.गेल्या २० वर्षांत पहिल्यांदाच, एखादा चित्रपट पुरस्कार सोहळा थेट प्रक्षेपित केला जाणार आहे.

# एयू स्मॉल फायनान्स बँकेने नाशिक वन विभागाच्या वन्यजीव तत्काळ प्रतिसाद क्षमतेला दिली नवी चालना

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भारतातील सर्वांत मोठी स्मॉल फायनान्स बँक आणि गेल्या दशकभरात युनिव्हर्सल बँकेत रूपांतरित होण्यासाठी तत्त्वत: मान्यता मिळवणारी पहिली बँक असलेल्या एयू स्मॉल फायनान्स बँकेने (एयू एसएफबी), समुदाय सुरक्षा आणि पर्यावरण रक्षणाप्रति आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी आणि प्रतिसाद यंत्रणा मजबूत करण्यासाठी बँकेने नाशिक वन विभागाला एक समर्पित क्षेत्रीय कार्य वाहन (फिल्ड ऑपरेशन व्हेईकल) भेट दिले आहे.




नाशिक जिल्हा प्रशासनाने वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना लक्षात घेता बँकेकडे मदतीची विनंती केली होती. या उपक्रमांतर्गत एक 'रेस्क्यू पिक-अप' वाहन तैनात करण्यात आले असून, यामुळे वन्यजीव घटनांच्या वेळी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांची गतिशीलता आणि त्वरित प्रतिसाद देण्याची क्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. याचा फायदा नाशिक आणि आसपासच्या परिसरातील रहिवाशांना, तसेच वन्यजीव मोहिमांमध्ये गुंतलेले वन अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाला होईल.

नागरी वस्ती आणि वन्यजीव अधिवास यांच्यातील वाढत्या संपर्कामुळे मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या नवीन वाहनामुळे वन विभागाला आणीबाणीच्या कॉलवर व वन्यजीव आढळल्यास त्वरित प्रतिसाद देणे शक्य होईल, तसेच रेस्क्यू ऑपरेशन (बचाव कार्य) व वन्यजीवांचे सुरक्षित स्थलांतर अधिक कार्यक्षमतेने करता येईल. याशिवाय संवेदनशील भागात गस्त आणि देखरेख वाढवणे आणि नागरिक व वन्यजीव दोघांच्या सुरक्षिततेसाठी वेळेवर हस्तक्षेप सुनिश्चित करणेही सुलभ होणार आहे. नाशिक पश्चिम विभागाचे उपवनसंरक्षक कार्यालय (उंटवाडी फॉरेस्ट रेस्ट हाऊस कंपाउंड, संभाजी चौक) येथे हा हस्तांतरण सोहळा पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक नाशिक) जी. मल्लिकार्जुन, उपवनसंरक्षक (पश्चिम विभाग) सिद्धेश सावरदेकर, सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक) प्रशांत खैरनार आणि नाशिक विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुमित निर्मल उपस्थित होते. एयू स्मॉल फायनान्स बँकेचे प्रतिनिधित्व अरविंद पुरोहित (नॅशनल बिझनेस हेड) आणि अनिरुद्ध हजारे (डेप्युटी व्हाईस प्रेसिडेंट) यांनी केले.

# महाराष्ट्र आणि मॉरिशस मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे : रवींद्र चव्हाण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यान्‌पिढ्यांचे असून, सातासमुद्रापार राहूनही येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे, असे गौरवोद्गार भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मॉरिशस येथे काढले. मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा नुकताच रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रभवन वास्तूच्या विस्तारासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याबाबद्दल उपस्थितांनी



कृतज्ञता व्यक्त केली.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मॉरिशसच्या दोनदिवसीय दौऱ्यात उच्चस्तरीय मान्यवरांच्या भेटीगाठी घेत भारत-मॉरिशस संबंध अधिक दृढ केले. या दौऱ्यात रवींद्र चव्हाण यांनी मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष धरमबीर गोखुल यांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत भारत-मॉरिशस मैत्री, ब्ल्यू इकॉनॉमी, पर्यटन, अख आणि सायबर सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. मॉरिशस हा भारताचा लहान भाऊ आहे, असे सांगत राष्ट्राध्यक्षांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे कौतुक केले, तसेच भारताने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

त्याचबरोबर मॉरिशसचे परराष्ट्रमंत्री धनंजय रामफुल, आयटी व इनोव्हेशनमंत्री डॉ. अविनाश रामतोहूल आणि कला व सांस्कृतिक मंत्री महेंद्र गोंदिया यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या. डॉ. रामतोहूल यांनी फर्ग्युसन कॉलेजमधील त्यांच्या शिक्षणाच्या आठवणी सांगत कृत्रिम बुद्धिमत्तेवर त्यांनी लिहिलेले पुस्तक भेट दिले. महाराष्ट्रातील रेशनिंग व्यवस्थेत जीपीएस तंत्रज्ञानाद्वारे पारदर्शकता आणण्याच्या निर्णयांचे त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच मॉरिशसला आफ्रिकेसाठी एआय क्षेत्राचे 'प्रवेशद्वार' बनविण्यासाठी भारताचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याचबरोबर सांस्कृतिक देवाण-घेवाण, वाचनालय, जागरी नृत्याचे युनेस्को नामांकन यांसारख्या विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली.

# आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ स्मॉलकॅप २५० इंडेक्स फंड लाँच

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्सने आपल्या युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्स (युलिप) अंतर्गत आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ स्मॉलकॅप २५० इंडेक्स फंड लाँच केला आहे. हा फंड ग्राहकांना उदयोन्मुख सूचीबद्ध कंपन्यांच्या विस्तृत समूहात गुंतवणूक करण्याची आणि निर्देशांकाधारित शिस्तबद्ध पद्धतीद्वारे दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची संधी उपलब्ध करून देतो.

हा फंड स्मॉलकॅप २५० इंडेक्सचा मागोवा घेतो,ज्यामध्ये निफ्टी ५०० विश्वातील २५१व्या ते ५००व्या क्रमांकावरील २५० कंपन्यांचा समावेश आहे. तथापि, नियमांमुळे कंपनीला निर्देशांकातील सर्व समभागांमध्ये त्यांच्या वजनानुसार नेहमीच गुंतवणूक करणे शक्य नसेल. परिणामी, ट्रॅकिंग एरर होण्याची शक्यता आहे. हा फंड लहान आकाराच्या सूचीबद्ध व्यवसायांमध्ये गुंतवणुकीची संधी देतो,जे त्यांच्या वाढीच्या प्रवासाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर आहेत आणि भविष्यात विस्तार करण्याची क्षमता ठेवतात.

या लाँचबाबत मत व्यक्त करत आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे मुख्य गुंतवणूक अधिकारी मनीष कुमार म्हणाले, की स्मॉलकॅप २५० इंडेक्स फंड ग्राहकांना उदयोन्मुख कंपन्यांच्या वाढीच्या संधींमध्ये सहभागी होण्यासाठी आणि दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी एक सोपी व पारदर्शक संधी उपलब्ध करून देतो. त्यामुळे विविध क्षेत्रांतील उदयोन्मुख कंपन्यांमध्ये संरचित पद्धतीने गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी हा फंड योग्य आहे.

नियम-आधारित पद्धतीमुळे विविध व्यवसायांमध्ये गुंतवणुकीचे व्यापक विविधीकरण मिळते आणि ते बेंचमार्कशी सुसंगत राहून शिस्त राखते. विशेष म्हणजे, या फंडद्वारे वित्तीय सेवा, आरोग्य सेवा आणि कॅपिटल गुड्स यांसह विविध क्षेत्रांतील २५० उदयोन्मुख कंपन्यांमध्ये व्यापक गुंतवणूक करता येते, ज्यामुळे गुंतवणूकदारांना एका फंडाद्वारे अर्थव्यवस्थेतील अनेक वाढत्या कंपन्यांमध्ये सहभाग घेता येतो.

# विमा कंपन्यांनी ६.३० लाख कोटी रुपयांचे लाभ देऊन कौटुंबिक आर्थिक सुरक्षेचा प्रबळ आधारस्तंभ म्हणून आपली ओळख निर्माण केली : इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भारतातील जीवन विमा क्षेत्र कुटुंबांचे संरक्षण आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजनामध्ये सातत्याने महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आयआरडीएआयच्या २०२४-२५ च्या नवीन वार्षिक अहवालानुसार, जीवन विमा कंपन्यांनी आर्थिक वर्ष २०२५ मध्ये एकूण ६.३० लाख कोटी रुपयांचे लाभ दिले आहेत. या आकडेवारीमधून जीवन विमा उद्योग भारतातील कुटुंबांना संरक्षणापासून निवृत्तीपर्यंत आणि संपत्ती निर्मितीपर्यंत त्यांच्या जीवनातील प्रत्येक टप्प्यावर देत असलेला आर्थिक आधाराचा स्तर दिसून येतो.

''पर्सिस्टन्सी म्हणजेच विमा सुरू ठेवण्याचे प्रमाण, लाभांचे वाटप आणि आर्थिक सक्षमता यांसारख्या महत्त्वाच्या आकडेवारीमधून स्पष्ट होते, की भारतातील जीवन विमा क्षेत्र कुटुंबांसाठी संपत्तीच्या साठ्यासारखे आहे, जे रोख उपलब्धता आणि दीर्घकालीन स्थिरता या दोन्ही गोष्टी प्रदान करते. विशेष म्हणजे, विम्याद्वारे देण्यात आलेल्या लाभांपैकी ९२ टक्के लाभ हे हयात असताना मिळणारे लाभ म्हणून देण्यात आले आहेत. यामधून निदर्शनास येते, की हा उद्योग संरक्षण देण्यासोबत दीर्घकालीन आर्थिक भागीदार आहे, जो कुटुंबांच्या आर्थिक सातत्याची खात्री देतो. आमच्या मोहिमांच्या माध्यमातून आम्ही व्यक्तींना जीवन विम्याच्या क्षमतेबद्दल जागरूक करीत राहू, ज्यामुळे ते आपल्या कुटुंबाचे आर्थिक संरक्षण करू शकतील आणि विश्वासार्ह आर्थिक साठा निर्माण करू शकतील,'' असे भारतातील जीवन विमा कंपन्यांच्या व्यवसाय तत्त्वाचे स्पष्टीकरण देताना इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाईफ) चे अध्यक्ष कमलेश राव म्हणाले.

# एअरबीएनबीने महाराष्ट्राची भारताचे 'इव्हेंट टुरिझम' केंद्र म्हणून होत असलेली वाढ केली अधोरेखित

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** एअरबीएनबीचा अलीकडेच प्रकाशित झालेला अहवाल 'अनलॉकिंग महाराष्ट्र इव्हेंट इकॉनॉमी: पॉवरिंग टुरिझम ॲण्ड लोकल कम्युनिटीज्' मध्ये अधोरेखित करण्यात आले, की प्रवासाला वाढत्या प्रमाणात अनुभवांमुळे चालना मिळत असल्याने महोत्सव, क्रीडा कार्यक्रम आणि सांस्कृतिक उत्सव महाराष्ट्रभर पर्यटनाची मागणी आणि पर्यटकांच्या खर्चाला वेग देत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र भारतातील कार्यक्रमकेंद्री प्रवासाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

राज्यभरात मोठ्या प्रमाणावरील उपक्रमांमुळे पर्यटकांमध्ये मोठी वाढ होऊ लागली आहे. सन २०२३ मधील विश्वचषक सामन्यांदरम्यान, महाराष्ट्रत राहिलेल्या पाहुण्यांमध्ये वार्षिक स्तरावर ५० टक्के वाढ झाली. त्याचबरोबर सामन्याच्या तारखांदरम्यान पर्यटकांच्या चेक-इनमध्ये ७५ टक्के वाढ झाली. तसेच जानेवारी २०२५ मध्ये मुंबईतील कोल्डप्लेच्या कार्यक्रमादरम्यान बुकिंगमध्ये १०० टक्के वाढ झाली आणि मैफलीच्या तारखांदरम्यान पाहुण्यांच्या संख्येत १७० टक्के वाढ झाली. पर्यटकांनी या क्षणांचे ट्रिप्समध्ये रूपांतर केले. हा कल पुढे लोलापलूझा इंडिया २०२६ सारख्या उत्सवांमध्ये प्रतिबिंबित झाला, जेथे मुंबईतील बुकिंगमध्ये वार्षिक स्तरावर ५० पेक्षा जास्त वाढ झाली आहे. जानेवारीमधील सर्व बुकिंगपैकी ८० टक्यांपेक्षा जास्त बुकिंग महोत्सवाच्या आठवड्यात होते.

अलीकडील सर्वेक्षणानुसार, तरुण भारतीय कार्यक्रमावर आधारित प्रवासावर अधिकाधिक खर्च करत आहेत. त्यातील प्रत्येक ट्रिपमध्ये सामान्यत: ५१ हजार रुपये खर्च करतात आणि दहापैकी सहा प्रवासी त्यांच्या मासिक उत्पन्नाच्या २१-४० टक्के संगीतावर आधारित प्रवासावर खर्च करतात. कॉन्सर्टच्या तिकिटावर खर्च केलेल्या प्रत्येक एक हजार रूपयांमागे अतिरिक्त १५०० - २००० रुपये पर्यटन अर्थव्यवस्थेत, निवास, वाहतूक आणि स्थानिक व्यवसायांमध्ये विभाजित होतात.

# एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ अबाधित राहणारा वॉटरप्रूफिंगचा महाविजेता

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भारतीय घरांना दरवर्षी दोन कठीण ऋतूंचा सामना करावा लागतो‌मुसळधार पाऊस आणि उन्हाळ्यातील लाही लाही करणारी उष्णता. तरीही, अनेक घरमालक आपल्या गच्च्या आणि छतांचे संरक्षण करण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांवर आणि अविश्वसनीय वॉटरप्रूफिंग उपायांवर अवलंबून राहतात. त्यांच्या या अगदी अलीकडील मोहिमेद्वारे, 'एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ' एका महत्त्वाच्या मुद्यावर लक्ष केंद्रित करते: सर्वच वॉटरप्रूफिंग सारखे नसते.गेल्या १३ वर्षांहून अधिक काळ, एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ' घरमालकांना त्यांच्या घरांत पाणी झिरपणे आणि तीव्र हवामानापासून संरक्षण करण्यास मदत करीत आहे. हे द्रावण पाण्याचा भिंतींमध्ये शिरकाव होण्यापासून रोखणारा एक जाड, जलरोधक थर तयार करते आणि भारतातील तीव्र हवामानापासून दीर्घकाळ टिकणारे संरक्षण पुरविते.




रणबीर कपूर आणि सौरभ शुक्ला यांची प्रमुख भूमिका असलेला या ब्रँडचा अगदी अलीकडचा चित्रपट, विनोद, मिश्कील चेष्टामस्करी आणि खेळीमेळीच्या संवादांनी ओसंडणारी एक अत्यंत जिवंत कथा सांगतो. घरमालकांच्या दैनंदिन चिंतांमध्ये रुजलेला हा चित्रपट, पावसाळ्यात छतांची गळती ते उघड्या छतामुळे होणारा उकाडा अशा सामान्य समस्यांना टिपतो आणि त्यांचे एका चित्तवेधक व मनोरंजक संभाषणात रूपांतर करतो.

एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (एमडी ॲण्ड सीईओ) अमित सिंगल म्हणाले, ''भारतीय घरांना मुसळधार पाऊस ते अतिशय कडक उन्हाळा अशा तीव्र हवामानांना तोंड द्यावे लागते; आणि घराचा सर्वांत जास्त खुला भाग हा अनेकदा गच्चीच असतो.'' एशियन पेंट्स डॅम्प प्रुफ अत्यंत विश्वासार्ह आणि दीर्घकाळ टिकणारे वॉटरप्रूफिंग देते; हे केवळ गळतीच रोखत नाही, तर उष्णता कमी करण्यासही मदत करते. याचे प्रगत उष्णता-परावर्ती कोटिंग पृष्ठभागाचे तपमान सुमारे १० डिग्री सेल्सिअसने कमी करते आणि हे १० वर्षे वॉटरप्रुफ राहण्याची हमी देते; ज्यामुळे घरे वर्षभर संरक्षित आणि आरामदायी राहण्यास मदत मिळते. ही मोहीम हे प्रमुख लाभ आकर्षक पद्धतीने सादर करते.

# देवळ्यात उबाठा गटाच्या १३ पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश



**देवळा (भ्रमर वार्ताहर) :-** देवळा तालुक्यात शिवसेना उबाठा गटाला धक्का बसला असून, १३ पदाधिकाऱ्यांनी उबाठा गटाला सोडचिठ्ठी देत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. गत आठवड्यात राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.

शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यांमध्ये विजय जगताप, विजय आहेर, एस. के. शिंदे, भूषण गोराणे, आशिष सूर्यवंशी, खुशाल देवरे, बाबाजी माळी, सुनील शिंदे, संजय बर्वे, बबन आहेर, भारत बोरसे, प्रभाकर चव्हाण आणि किरण पाटील आदींचा समावेश आहे.

दरम्यान, उबाठा गटाकडून केवळ दोनच पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याचा दावा करण्यात आला होता; मात्र शिंदे गटाने हा दावा फेटाळून लावत १३ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रवेश केल्याचे सांगितले. उबाठा गटाच्या तालुका नेतृत्वावर संघटनात्मक कामकाज ठप्प ठेवणे, शाखा सुरू न करणे आणि बैठका न घेणे अशा कारणांमुळे कार्यकर्त्यांचा विश्वास कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे. आमंत्रण हॉटेल येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत ही भूमिका मांडण्यात आली. यावेळी शिंदे गटात प्रवेश केलेल्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. बैठकीत शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, की संबंधित प्रवेश प्रक्रिया अधिकृत व नियमानुसार पार पडली आहे.

यावेळी उपजिल्हाप्रमुख देवा वाघ, तालुकाप्रमुख दीपक निकम, तालुका संघटक योगेश अहिरे, उपतालुकाप्रमुख विष्णू जाधव, युवा सेनेचे तालुकाप्रमुख प्रतीक आहेर, शैलेश गुंजाळ, सचिन आहेर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप कामगार मोर्चाची कार्यकारिणी घोषित



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा, नाशिक महानगर जिल्ह्याच्या वतीने नुकताच पदाधिकारी नियुक्ती सोहळा आणि मार्गदर्शक मेळावा वसंत स्मृती, एन. डी. पटेल रोड येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तिपत्रे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पक्षाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी यांनी यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना भारतीय जनता पार्टीच्या ऐतिहासिक प्रवासावर प्रकाश टाकला. जनसंघापासून सुरू झालेला हा प्रवास आज जगातील सर्वांत मोठा पक्ष बनण्यापर्यंत कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती त्यांनी दिली. ''पक्षाची विचारधारा हीच आपली खरी शक्ती असून, प्रत्येक कार्यकर्त्याने ती आत्मसात करावी,'' असे प्रतिपादन त्यांनी केले. या सोहळ्यात खालील प्रमुख पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली सरचिटणीस - निखिल पाटील, सागर खैरनार, मनोज पाटील, उपाध्यक्ष - सचिन होलीन, विवेक बिऱ्हाडे, राजेंद्र पाठक, आशिष दलोड, विक्रम वाबळे, राहुल पंडित. चिटणीस- नरेश पंडित, किरण मोरे. कोशाध्यक्ष अनिकेत कदम प्रसिद्धिप्रमुख-जितेंद्र संकपाळ.

उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस व्यंकटेश नानासाहेब मोरे यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नाशिक महानगर अध्यक्ष हेमंत जनार्दन नेहते यांनी कामगारांच्या हक्कांसाठी संघटन सदैव तत्पर राहील, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष सुनील केदार, भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सवाजी साहेब, प्रदेश नेते प्रदीप पेशकार, भारतीय जनता पक्षाचे गटनेते शाम बडोदे, भाजपच्या सरचिटणीस रश्मी हिरे, नाना शिलेदार, कुणाल वाघ, तसेच पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

# इंधनटंचाईच्या अफवेमुळे पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या रांगा

**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :-** गेल्या काही तासांपासून शहर आणि परिसरात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरली आहे.

या अफवेमुळे शहरातील सर्वच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची प्रचंड गर्दी उसळल्याचे पाहायला मिळाले. यामुळे पेट्रोल पंपचालकांची मोठी तारांबळ उडाली, तर ग्राहकांना समजावून सांगता सांगता पेट्रोल पंपचालकांची दमछाक झाली. यावेळी शेतकऱ्यांनीदेखील ट्रॅक्टरमध्ये डिझेल भरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

मनमाड शहर परिसरात उद्यापासून पेट्रोल पंप बंद राहणार आहेत, अशी माहिती सोशल मीडियावर पसरली. यामुळे पेट्रोल भरण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली.

केवळ दुचाकी किंवा चारचाकीधारकच नव्हे, तर ट्रॅक्टरसाठी डिझेलचा साठा करण्यासाठी शेतकऱ्यांनीही पंपांवर मोठी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्यामुळे वाहतुकीची कोंडीही निर्माण झाली होती. अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे पंपांवरील कर्मचाऱ्यांची मोठी धावपळ उडाली.

या परिस्थितीवर स्पष्टीकरण देताना पेट्रोल पंपाच्या संचालकांनी सांगितले, की इंधन टंचाईची बातमी पूर्णपणे चुकीची आहे. पेट्रोल किंवा डिझेलचा कोणताही तुटवडा नाही आणि पेट्रोल पंप बंद राहणार नाहीत. नागरिकांनी अफवांना बळी पडून गर्दी करू नये. युद्धाचा परिणाम असला, तरी पण साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे

इराण, अमेरिका आणि इस्राईल यांच्यातील वाढत्या तणावामुळे आखाती देशांतून होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यावर जागतिक स्तरावर काहीसा परिणाम झाला आहे; मात्र केंद्र सरकारने यापूर्वीच स्पष्ट केले आहे, की भारतात गॅस, पेट्रोल व डिझेलचा पुरेसा आणि मुबलक साठा उपलब्ध आहे. त्यामुळे देशांतर्गत पुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

नागरिकांनी पॅनिक बाइंग (घाबरून खरेदी) टाळावी. इंधन पुरवठा सुरळीत सुरू असून, अफवा पसरविणाऱ्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येत आहे; मात्र तरीही नागरिकांनी पेट्रोल पंपावर मोठ्या प्रमाणावर गद केली होती.



# अन्नपुरवठा मंत्र्यांसमोर मांडले गाऱ्हाणे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अन्नपुरवठा केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची हुबळी येथे राज्य फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी बाबूराव म्हमाणे भेट घेऊन संपूर्ण राज्यातील परवानाधारकांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सर्व मागण्याचे हे लेखी स्वरूपात निवेदनपत्र देण्यात आले.

केलेल्या सर्व मागण्याचे सविस्तर चर्चा करून सहानुभूतीने सकारात्मक निर्णय घेऊन त्वरित अंमलबजावणीची कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले, तसेच सदैव केंद्र शासनाच्या वतीने राज्य शासनास सहकार्य मिळेल, अशी माहिती गणपत डोळसे पाटील व निवृत्ती कापसे यांनी दिली.

# डॉ. राम कुलकर्णी यांच्या शंभराव्या पुस्तकाचे प्रकाशन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** गोखले एज्युकेशन सोसायटीचे विभागीय सचिव आणि लेखक डॉ. राम कुलकर्णी यांच्या शतकमहोत्सवी शंभराव्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ दीप्ती देशपांडे आणि वक्ते प्रकाश पाठक यांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन स्वयंविकास प्रबोधिनी आणि सानिका प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. जीवन समृद्धीचा महामार्ग हे डॉ. राम कुलकर्णी यांचे शंभरावे पुस्तक समाजाला समृद्ध जीवन कसे जगावे याचे प्रभावी प्रबोधन करेल, असे प्रतिपादन याप्रसंगी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. दीप्ती देशपांडे यांनी केले. याप्रसंगी डॉ. राम कुलकर्णी आणि प्रा. नीता कुलकर्णी यांनी लिहिलेल्या सहा चरित्र पुस्तकांचे प्रकाशनदेखील करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींना स्वयंविकास पुरस्कार व सानिका महिला गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कारांमध्ये भास्कर आचार्य (जीवन गौरव पुरस्कार), डॉ. आनंद पाटील (वैद्यकीय क्षेत्र), हेमंत पाठक (सामाजिक क्षेत्र), हर्षद बेळे (उद्योग क्षेत्र), मुकुल कुलकर्णी (पत्रकारिता क्षेत्र), ऋषिकेश खैरे (सामाजिक न्याय क्षेत्र), सुप्रेम फाऊंडेशन डॉ. प्रशांत भुतडा (संस्था पुरस्कार), आचार्य तुषार भोसले (आध्यात्मिक क्षेत्र), मंगला कलंत्री (महिला सबलीकरण क्षेत्र), आसावरी देशपांडे (महिला सक्षमीकरण क्षेत्र), रश्मी पोतदार (साहित्य क्षेत्र), डॉ. विद्या देशपांडे (योग प्रशिक्षण क्षेत्र), ज्योती आव्हाड (दिव्यांग क्षेत्र), सागर कुलकर्णी आणि प्रा. विनिता कुलकर्णी यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा परिचय करून दिला.

प्रा. जयंत भाभे यांनी अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांचा परिचय करून दिला. डॉ. अनिल सावळे यांनी आभार मानले. डॉ. स्नेहा रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले. आचार्य तुषार भोसले यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांतर्फे आपले मनोगत व्यक्त केले.

# दुर्मिळ मज्जासंस्था आजारांवर नाशिकमध्ये प्रादेशिक कार्यशाळा संपन्न




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राष्ट्रीय दुर्मिळ आजार धोरण २०२१ अंतर्गत, नाशिक येथील नारायणी हॉस्पिटल येथे 'मज्जासंस्थेशी संबंधित दुर्मिळ आजार' या विषयावर एकदिवसीय प्रादेशिक संवेदीकरण कार्यशाळा उत्साहात पार पडली. मुंबईच्या शेठ जी. एस. मेडिकल कॉलेज आणि के. ई. एम. रुग्णालयातील न्यूरोलॉजी विभागाच्या सहकार्याने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञांनी विविध गंभीर आजारांवर मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ. सोनाक्षी पुणतांबेकर, डॉ. मयूर ठक्कर, डॉ. नेहा पिचड, डॉ. आनंद दिवाण, डॉ. राहुल बाविस्कर आणि डॉ. नीरज जैन यांची व्याख्याने झाली. उपचारास योग्य असलेले स्नायूंचे विकार, स्पाइनल मस्क्यूलर ट्रॉफी, न्यूरोमेटाबॉलिक डिसऑर्डर, ल्युकोडिस्ट्रोफी आणि लायसोसोमल स्टोरेज डिसीजेस यांसारख्या क्लिष्ट विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. नाशिक शहर आणि परिसरातील अनेक डॉक्टरांनी या कार्यशाळेला उपस्थित राहताना, दुर्मिळ आजारांच्या निदानाबद्दल नवीन माहिती जाणून घेतली. स्थानिक स्तरावर अशा आजारांचे लवकर निदान झाल्यास रुग्णांना वेळीच उपचार मिळणे सोपे होईल, असा सूर या चर्चेतून उमटला. यावेळी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय दुर्मिळ आजार धोरणाबद्दल अत्यंत महत्त्वाची माहिती देण्यात आली. भारत सरकार नियुक्त केलेल्या केंद्रीय संस्थांमध्ये ठराविक दुर्मिळ आजारांच्या उपचारांसाठी प्रति रुग्ण ५० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत पुरवते.

# सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गतची कामे गुणवत्तेसह पूर्ण करण्यास गती द्यावी : सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले




**नाशिक (जिमाका):-** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित व सुरू असलेली सर्व कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्वक होतील यावर अधिक भर देत कामांना गती द्यावी असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रराजे भोसले यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालयात आयोजित सिंहस्थ कुंभमेळा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत औटी, उपवनसंरक्षक (पश्चिम) सिद्धेश सावर्डेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, सार्वजनिक बांधकाम विभाग संभाजीनगर चे अधीक्षक अभियंता विवेक माळुंजे, दक्षता व गुणवत्ता नियंत्रण मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. कंकरेज, सा. बा. विभाग नाशिकचे कार्यकारी अभियंता राहुल पाटील, नवनाथ सोनवणे, मुकेश ठाकूर, उप अभियंता विजय बाविस्कर, उमाकांत कुमावत, राष्ट्रीय महामार्ग विभाग नाशिकचे कार्यकारी अभियंता संजय शेवाळे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. भोसले म्हणाले की, सिंहस्थ कुंभमेळादृष्टीने करण्यात येणारी सर्व कामे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्राधान्य क्रमातील कामे आहेत. ही सर्व कामे दर्जात्मक होण्यासाठी त्रयस्थ पक्षाकडून कामांची वेळोवेळी तपासणी केली जाणार आहे. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणानेही त्यांच्या स्तरावर या कामांची त्रयस्थ पक्षाकडून तपासणी केल्यास कामे गुणवत्तापूर्वक होतील यासाठी दक्ष रहावे. ज्या कामांना मंजूरी मिळाली आहे व कोणत्याही स्वरूपाची अडचण नाही ती कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी. वन विभाग व जलसंपदा विभागने रस्त्यांच्या कामांसाठी आवश्यक परवानग्या देण्यासाठी कार्यवाही सत्वर करावी. ठेकेदारांनीही विहित मुदतीत कामे पुर्ण करण्यावर अधिक भर द्यावा. पहिल्या टप्प्यातील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करावे तसेच रात्रीच्या वेळीही कामे सुरू ठेवावीत. कामे विहित मुदतीत पूर्ण न झाल्यास दंडात्मक कारवाईबाबत अवगत करण्यात यावे. अशा सूचना त्यांनी दिल्या.

सिंहस्थ कुंभमेळादृष्टीने नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्ता तयार करतांना सुशोभिकरणावर भर द्यावा. तसेच ठिकाठिकाणी भाविकांच्या सोयीच्या दृष्टीने लावण्यात येणारे दिशादर्शक फलक यांच्या आकारात एकसमानता असावी, असेही मंत्री भोसले यांनी सूचित केले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ.गेडाम यांनी सिंहस्थ कुंभमेळा आराखड्यातील नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील प्रस्तावित व मंजूर कामांची माहिती दिली. आयुक्त शेखर सिंह यांनी त्र्यंबकेश्वर व नाशिक येथील कुंभमेळा प्रस्तावित आवश्यक परवानग्या व त्याबाबत करावयाची कार्यवाही याबाबत चर्चा केली. जिल्हाधिकारी प्रसाद यांनी या कामांसाठी आवश्यक भूसंपादन व इतरबाबत बैठकीत माहिती दिली. अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांच्या सद्यस्थितीबाबत आराखड्याद्वारे सादरीकरण केले. तसेच प्रत्येक कामासाठी नियुक्त केलेल्या संस्था व ठेकेदार यांच्याशी कामांबाबत असलेल्या अडीअडचणींबाबत मंत्री भोसले यांनी चर्चा केली. बैठकीपूर्वी मंत्री महोदय आणि संबंधित अधिकारी यांनी सिंहस्थाच्या कामांना भेटी देवून कामांची पाहणी केली

# भंगार ऑटोरिक्षा वाहनांचा ९ एप्रिल रोजी ई-लिलाव

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, मालेगाव यांच्या मार्फत मोटार वाहन कायद्यान्वये जप्त करण्यात आलेल्या भंगार (स्क्रॅप) २२ ऑटोरिक्षा वाहनांचा जाहीर ई-लिलाव ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती कराधान अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मालेगाव विनोद जाधव यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये दिली आहे.

ही २२ वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आवारात पाहणीसाठी उपलब्ध आहेत. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी दि. २५ मार्च ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत कार्यालयाच्या www. eauction. gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. रुपये २५ हजार अनामत रक्कम व रुपये १ हजार लिलाव शुल्क एमएम डीवाय आरटीओ, मालेगाव या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या धनाकर्षाची (डिमांड ड्राफ्ट) प्रत्यक्ष येऊन पूर्तता करावी. ई-लिलावाच्या अटी व शर्ती, तसेच वाहनांची सविस्तर माहिती २५ मार्च २०२६ पासून संकेतस्थळावर तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, मालेगाव येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील. सदर वाहने जशी आहेत, तसे या तत्त्वावर विक्री करण्यात येणार आहेत. कोणतेही कारण न देता ई-लिलाव रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा अधिकार कराधान अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मालेगाव यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, मालेगाव येथे संपर्क साधावा, असे आवाहन कराधान अधिकारी जाधव यांनी केले आहे.

# जिल्ह्यात पाच हजार कामगांराना आर्थिक साक्षरतेचे मिळाले प्रशिक्षण

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्याचा कामगार विभाग आणि गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपच्या सहकार्याने नाशिक जिल्ह्यात सामाजिक हक्क आणि आर्थिक साक्षरतेबाबत पाच हजार कामगारांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. या कुंभमेळ्यासाठी देश- विदेशातून कोट्यवधी भाविक येण्याची शक्यता आहे. या भाविकांना पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून दळणवळणाची साधने, पाणीपुरवठा व स्वच्छता, नदीकाठावर घाट आदी विविध विकास कामे सुरू आहेत. या विकास कामांवर शेकडो बांधकाम कामगार कार्यरत आहेत.

बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजूर काही वेळेस स्थलांतरित असतात. त्यांच्याकडे आवश्यक सोयीसुविधा प्राप्त करून घेण्यासाठी कागदपत्रे नसतात. त्यामुळे ते राज्य शासनाने बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांधकाम कामगारांसाठी 'सामाजिक सुरक्षा' या संकल्पनेवर भर दिला आहे. त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या बांधकाम कामगारांना मुख्य प्रवाहात आणून त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी गोदरेज कंपनीच्या सहकार्याने प्रशिक्षण वर्ग, सामाजिक आणि आर्थिक साक्षरता वर्ग, जनजागृती शिबिर आदी उपक्रम राबविण्यात आले. यातून बांधकाम कामगारांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात आली. या कामगारांना मार्गदर्शन, समुपदेशन, आरोग्य तपासणी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या जागृती प्रशिक्षणाचा पाच हजार कामगारांना लाभ झाला, तसेच बीओसीडब्ल्यू नोंदणी कार्ड आणि सुरक्षा संच ७९९ कामगारांना देण्यात आला. एवढेच नव्हे, तर पाचशे प्रशिक्षित समुदाय समन्वयक बांधकाम कामगारांना मार्गदर्शन करीत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे बांधकाम कामगारांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणीव आणि जनजागृती निर्माण होत आहे.

# गोठेधारकांनी ३० एप्रिलपर्यंत गुरे परवाना नूतनीकरण करावे : वाय. आर. नागरे

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील गोठेधारकांना सन २०२५-२६ वर्षाकरिता गुरे परवाना नूतनीकरण व नवीन परवाना काढण्यासाठी दि. १ ते ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील सर्व गोठेधारकांनी गुरे परवाना नूतनीकरण व विनापरवाना गोठे धारकांनी नवीन परवाने काढून घ्यावेत, असे जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी वाय. आर. नागरे यांनी कळविले आहे.

जिल्ह्यातील महानगरपालिका क्षेत्रातील नाशिक शहर परिसरासह गंगापूर, आनंदवल्ली, मखमलाबाद, म्हसरूळ, आडगाव, मानूर, वडनेर दुमाला, पिंपळगाव खांब, दाढेगाव, पाथर्डी वडाळा (शिवार), त्र्यंबक खुर्द, कामटवाडे, चुंचाळे, पिंपळगाव बहुला या भागांचा समावेश करण्यात आला आहे, तसेच विनापरवाना अथवा विनाअनुज्ञप्ती गुरे बाळगणे यासाठी रुपये २ हजार पर्यंत दंड व ३ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षेची तरतूद नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये गुरे पाळणे आणि त्यांची ने आण करणे (नियंत्रण) अधिनियम १९७६ कायद्याच्या अधिनियम कलम १३ (१) (ब) अन्वये करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या अधिसूचनेद्वारे नाशिक महानगरपालिका क्षेत्रासाठी महाराष्ट्र नागरी क्षेत्रामध्ये गुरे पाळणे आणि त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम १९७६ हा कायदा लागू केला आहे. या कायद्यान्वये विनापरवाना गुरे पाळणे, गुरांची ने-आण करणे गुन्हा आहे. महानगरपालिका क्षेत्रातील गुरे परवानाधारकांनी नूतनीकरणासाठी येताना सोबत मूळ परवाना व प्रतिजनावर ५० रुपये अनुज्ञप्ती शुल्क सोबत आणावे. दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत दिलेल्या मुदतीत परवाना नूतनीकरण न केल्यास प्रतिजनावर पाच रुपये इतके विलंब शुल्क आकारण्यात येईल, याची गोठेधारकांनी नोंद घ्यावी.

गुरे परवाना नूतनीकरण व नवीन परवाना काढणे याबाबतची अधिक माहिती जाणून घेण्यासाठी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालय, शासकीय, दूध योजना आवार, त्र्यंबक रोड, नाशिक या पत्त्यावर अथवा ९५५२६२१८९३ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी वाय. आर. नागरे यांनी केले आहे.

## खुलासा

दैनिक भ्रमरच्या दिनांक १३ मार्च २०२६ रोजीच्या अंकात ड. जे. बी. केदारे यांच्यामार्फत जाहीर फारकतीची नोटीस प्रसिद्ध झालेली आहे. वृत्तपत्रातील जाहिरातीचा मजकूर हा जाहिरात देणाऱ्याने दिलेला असतो. त्याची जबाबदारी जाहिरात देणाऱ्याची असते. वर नमूद जाहिरातीत उल्लेख केलेल्या कोणत्याही व्यक्तीस आम्ही ओळखत नाही, त्यामुळे त्यांची बदनामी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तरीही वरील नमूद जाहिरातीमुळे श्री. निलेश रविंद्र सोनवणे यांना काही त्रास झाला असल्यास आम्ही दिलगिरी व्यक्त करतो.

-संपादक

# विभागीय माहिती कार्यालयाचे आवाहन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** विभागीय माहिती कार्यालय, नाशिक या कार्यालयात कार्यालयीन उपयुक्ततेसाठी स्थानिकरीत्या वृत्तपत्र खरेदी केली जातात. वृत्तपत्रांची कात्रणे काढल्यानंतर वृत्तपत्रांची रद्दी विक्री करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी दि. २४ मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत (शासकीय सुट्टी वगळून) दर नमूद करून सदर दरपत्रक उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, बी. डी. भालेकर मैदान, महाकवी कालीदास कलामंदिर समोर येथे बंद लिफाफ्यात सादर करावीत.

या कार्यालयात नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील (एकूण १६ महिन्यांची) वृत्तपत्रांची रद्दी जमा असून, जानेवारी व फेब्रुवारी २०२६ या दोन महिन्यांची रद्दी कार्यालयीन उपयुक्ततेसाठी संग्रहित ठेवता उर्वरित (एकूण १४ महिन्यांची) रद्दी विक्री करण्याबाबत स्थानिकरीत्या बंद लिफाफ्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी आपली दरपत्रके विभागीय माहिती कार्यालय, नाशिक या कार्यालयात विहित मुदतीत सादर करावीत, असे आवाहन उपसंचालक (माहिती) नाशिक यांनी केले आहे.

# सायकलीवरून पडल्याने वृद्धाचा मृत्यू

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** गॅस एजन्सीमध्ये गॅस बुक करण्यासाठी वृद्धाचा सायकलीवरून पडल्याने बेशुद्ध झाल्यामुळे मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

रावसाहेब रावजी निकम (वय ६६, रा. मंगलमूर्तीनगर, बडदेनगर, सिडको) हे दि. २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास राहत्या घरातून सायकलीने गॅस एजन्सीमध्ये नंबर लावण्यासाठी जात होते. महाराणाप्रताप चौकात आले असता निकम हे सायकलीवरून खाली पडल्याने बेशुद्ध झाले. त्यांना पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून निकम यांना मयत घोषित केले. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## आजचे वाढदिवस


**विलास जगताप**
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर


**शंतनू देशपांडे**
संचालक, निशम डेव्हलपर्स


**स्वानंद बेदरकर**
साहित्यिक


**महेश महाले**
पत्रकार

## उद्याचे वाढदिवस


**भगवान सूर्यवंशी**
निवृत्त शिक्षण उपसंचालक


**शोभा छाजेड**
माजी उपमहापौर


**उमेश वैश्य**
उद्योजक

## बाळाचा वाढदिवस


**ईश्वरी ब्राह्मणे**

# विराट हिंदू संमेलनात जैन महासाध्वी मधुस्मिताजी आज करणार मार्गदर्शन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** हिंदू एकता, संस्कृती आणि राष्ट्रभावना दृढ करण्याच्या उद्देशाने नाशिकमध्ये विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम आज (दि. २८) सायंकाळी ६.३० वाजता हेमकुंज रोड, मखमलाबाद नाका, पंचवटी येथे संपन्न होणार आहे.

हिंदू सम्मेलन समिती, हेमकुंज रोड, मखमलाबाद नाका, मधुबन कॉलनी परिसर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, समाजातील विविध घटकांना एकत्र आणून 'भारतीय व हिंदू संस्कृती दाही दिशांना घुमवू या' हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या संम्मेलनासाठी संकल्पमूर्ती, स्वरसम्राज्ञी परमपूज्य मधुस्मिताजी म. सा. या प्रमुख अतिथी व वक्ता म्हणून उपस्थित राहणार आहेत. मैत्रेय शाखा कार्यवाहिका, राष्ट्र सेविका समितीच्या आरती पाठक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर सहकार्यवाह विक्रम थोरात हे प्रमुख वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हिरालाल परदेशी व स्वागताध्यक्ष म्हणून किसनलाल पारख आहेत.

कार्यक्रमानंतर सर्वांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन आयोजकांतर्फे योगेश गर्गे, शेखर जोशी, प्रा. सीए लोकेश पारख, संतोष मुळे, तुषार शामसुखा, हर्षल भागवत यांनी केले आहे.

# शहरात उद्या श्रीराम व गरुड रथाची मिरवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** श्रीराम आणि गरुड रथोत्सव चैत्र महिन्यातील कामदा एकादशीला काढण्यात येतो. हा रथोत्सव उद्या (दि.२९) सायंकाळी ५ वाजता काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाजापासून सुरू होईल. रथोत्सवासाठी दोन्ही रथ सज्ज करण्यात आले आहे.

मानकरी असलेल्या पुजाऱ्यांच्या हस्ते मंदिरात पूजा करून पालखीतून भोगमूर्ती श्रीरामरथात आणल्या जातात. या मूर्तींना रामकुंड येथे परंपरेनुसार अवभृत स्नान घालण्यात येणार आहे. तीन तासांच्या या पूजेनंतर रथ परतीच्या मार्गाने निघून काळाराम मंदिरात येतील.

काळाराम मंदिरात यंदाचे मानकरी वंशपरंपरागत पूजाधिकारी नरेंद्रबुवा पुजारी यांच्या हस्ते मूर्तीची पूजा करून त्या मूर्ती श्रीरामरथात मान्यवरांच्या हस्ते आरती करून स्थापित केल्या जातील. यावेळी रामरथ आणि गरुडरथ दोन्ही समातंर उभे केले जातील. आरतीनंतर गरुडरथ पुढे निघेल.

या रथाच्या पुढे सनई चौघडा असेल. मस्तकावर छत्री धारण केलेले यंदाचे मानकरी परंपरेनुसार रथाकडे तोंड करून उलट्या दिशेने मार्गक्रमण करतील. गरुडरथाची जबाबदारी श्रीकाळाराम संस्थानची असून, हा रथ ओढण्याचा मान अहिल्याराम व्यायाम शाळेकडे आहे.

रामरथ ओढण्याचा मान रास्ते आखाडा तालीम संघ आणि पाथरवट समाज यांच्याकडे आहे. दोन्ही रथ काळाराम मंदिराच्या पूर्व दरवाजापासून निघतील. नागचौक, चरणपादुका चौक, लक्ष्मण झुला पूल, जुना आडगाव नाका, गणेशवाडी, गौरी पटांगण, रामरथ गाडगे महाराज पुलाखालून म्हसोबा पटांगणावर थांबेल तर गरुडरथ गौरी पटांगणावरून रोकडोबा मैदानाकडे जाऊन पिंपळपार, धुमाळ पॉइंट, मेनरोड, बोहरपट्टी, सरकारवाडा, सराफ बाजार, भांडी बाजार, कपूरथळा, म्हसोबा पटांगण, सांडव्याच्या देवीसमोरून गंगाघाट मार्गे व्यायामशाळा येथे जाईल.

चांदवडकर गल्ली, अहिल्याराम व्यायामशाळा, रामकुंड, म्हसोबा पटांगणावर थांबलेला रामरथ गरुडरथाच्या मागे रामकुंडावर नेण्यात येईल. येथे अवभृत स्नान झाल्यानंतर परशराम पुरिया रोड, मालवीय चौक, शनिचौक, हनुमान चौक, काळाराम मंदिर पूर्व दरवाजा हा रथांचा परतीचा मार्ग असेल.

# नारायणी हॉस्पिटलच्या पोस्टर स्पर्धेत पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलचे यश



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** येथील नारायणी हॉस्पिटलतर्फे जागतिक किडनी दिनानिमित्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आयएमए हॉल, शालिमार येथे संपन्न झाला.

नाशिक व नाशिकरोडमधील वेगवेगळ्या शाळांतून ३५० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. दीपेश कागडा (इयत्ता आठवी ब ) मधील विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक प्राप्त करून २००० हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. प्रमुख पाहुणे डॉ. विजय घाडगे, प्रा. संजय साबळे, डॉ. देवीकुमार केळकर यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

शाळा समिती अध्यक्ष रावसाहेब गायधनी, प्राचार्य उमाकांत वाकलकर, उपमुख्याध्यापक संजय पाटील, पर्यवेक्षक डॉ. गजानन होडे, पर्यवेक्षक श्रावण सूर्यवंशी यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्याचे अभिनंदन केले. ही स्पर्धेसाठी नारायणी हॉस्पिटलचे सुबोध मराठे यांनी परिश्रम घेतले. या विद्यार्थ्याला कलाशिक्षक समीर कुलकर्णी, सुरेश गावित, सुमेधा गोडबोले, गीतांजली धुर्वे यांचे मार्गदर्शन लाभले.

# दोन लाखांची लाच घेताना प्रांतधिकाऱ्याला अटक

**पुणे (भ्रमर वृत्तसेवा):–** नारायणगाव येथील एका इमारतीला अंशत: पूर्णत्वाचा दाखला देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच घेणाऱ्या जुन्नर–आंबेगावमधील प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी पकडले. शिंदे यांनी एका बांधकाम व्यावसायिकाकडे पाच लाख रुपयांची लाच मागितली होती. मंचर येथील महसूल विभागाच्या कार्यालयात ही कारवाई करण्यात आली.

# नाशिकच्या मध्यवस्तीतील वाहतूक मार्गात उद्या बदल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिकचे ग्रामदैवत प्रभू श्रीरामचंद्र आणि श्री गरुड रथ मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी (२९ मार्च) शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत. मिरवणूक मार्गावरील गद आणि भाविकांची सुरक्षितता लक्षात घेता दुपारी २ वाजेपासून ते मिरवणूक संपेपर्यंत अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद राहतील. पोलीस उपआयुक्त (मुख्यालय/वाहतूक) किरिथिका सी. एम. यांनी यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे.

**रथयात्रेचा मार्ग:–** श्रीराम रथ मार्ग: काळाराम मंदिर पूर्व दरवाजा – नागचौक – चरणपादुका चौक – लक्ष्मण झुला – काट्या मारुती चौक – गणेशवाडी – महात्मा फुले पुतळा – आयुर्वेदिक हॉस्पिटल – गौरी पटांगण – म्हसोबा पटांगण – कपालेश्वर मंदिर – रामकुंड – परशुरामपुरिया रोड – मालवीय चौक – शनी चौक – हनुमान चौक – आखाडा तालीम आणि पुन्हा काळाराम मंदिर उत्तर दरवाजा ते पूर्व दरवाजा.

श्री गरुड रथ मार्ग: हा रथ श्रीराम रथासोबतच निघेल. मात्र, जुना आडगाव नाका, दिल्ली दरवाजा, नेहरू चौक, धुमाळ पॉईंट, मेनरोड, बोहोरपट्टी आणि सराफ बाजार मार्गे रामसेतू पुलाच्या पश्चिम बाजूने पुन्हा मुख्य मिरवणुकीत सामील होईल.

दुपारी २ वाजेपासून मिरवणूक संपेपर्यंत वरील सर्व मार्गांवर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी असेल. मिरवणूक मार्गाकडे येणारे अंतर्गत रस्ते बॅरिकेट्स लावून बंद केले जातील. त्यासाठी वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन सहायक आयुक्त अद्विता शिंदे यांनी केले आहे.

# नवश्या गणपती मंदिर घाट परिसरात विकासकामे प्रस्तावित

## 'एमएसआयडीसी' मार्फत महापालिकेला पत्राद्वारे कार्यवाहीच्या सूचना

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नवश्या गणपती मंदिर घाट येथे जाण्यासाठी १२ मीटर रुंदीचा प्रवेश रस्ता संपादन व विकसित करण्याबाबत महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा मर्यादीत विकास महामंडळाने महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्राद्वारे कळविले आहे.

नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक घाट व बंधारे या कामांसाठी १० डिसेंबर २०२५ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार 'एमएसआयडीसी' मार्फत नाशिक शहरातील विविध घाटांची बांधकामे हाती घेण्यात आलेली आहेत. या प्रकल्पांतर्गत नवश्या गणपती मंदिर घाट येथेही विकासकामे प्रस्तावित आहेत. या अनुषंगाने बेंडकुळेनगर येथील विद्यमान नऊ मीटर रुंदीच्या रस्त्यापासून नवश्या गणपती मंदिर घाटापर्यंत अंदाजे २०० मीटर लांबीचा व १२ मीटर रुंदीचा प्रवेश रस्ता तथा मार्ग उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे 'एमएसआयडीसी'च्या पत्रात म्हटले आहे. यासंदर्भातील तपशील 'एमएसआयडीसी'ने नकाशाच्या माध्यमातून मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविला आहे. या रस्त्यामुळे कुंभमेळ्यात घाटावर येणाऱ्या भाविक व पर्यटकांच्या वाहतूक व्यवस्थापनास तसेच प्रस्तावित विकासकामांच्या अंमलबजावणीस मोठी मदत होणार आहे. प्रवेश रस्ता संपादन व विकसित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी सूचनाही 'एमएसआयडीसी'ने दिली आहे. नवश्या गणपती मंदिरात दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी जात असतात. संकष्ट चतुर्थी, अंगारकी तसेच विनायक चतुर्थीला या भागाला जत्रेचे स्वरुप येऊन वाहतूक कोंडी निर्माण होत असते. सध्याचा असलेला नऊ मीटरचा रस्ता १२ मीटर रुंदीचा झाल्यास या भागातील वाहतूक कोंडी सुटून वाहनधारक आणि या भागातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात जनगणना कक्षाचे उद्‌घाटन

## अचूक माहिती संकलनासाठी समन्वयाने काम करण्याचे आवाहन

**नाशिक (जिमाका):–** जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून देशाच्या सामाजिक, आर्थिक व विकासात्मक नियोजनाचा आधारस्तंभ आहे. जिल्ह्यातील जनगणनेसाठी अचूक माहिती संकलनासाठी समन्वयाने काम करावे, असे आवहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.



जनगणना २०२७ मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र जनगणना कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षाचे उद्घाटन आ. माणिकराव कोकाटे, आ. सीमा अहिरे, आ. नितिन पवार, आ. सरोज अहिरे यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण (मालेगाव) हेमांगी पाटील (नाशिक) तहसीलदार (सामान्य प्रशासन) प्रदीप वर्पे, डॉ. दिनेश बच्छाव, सांख्यिकी अधिकारी मेघा इंगले यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना माहिती देतांना जिल्हाधिकारी प्रसाद म्हणाले की, जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात आलेला हा जनगणना कक्ष जिल्हास्तरावर समन्वय साधण्यासाठी, माहिती संकलनाची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच सर्व संबंधित विभागांशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवण्यासाठी केंद्रबिंदू म्हणून कार्य करणार आहे. या कक्षाच्या माध्यमातून प्रशिक्षण, नियोजन, डेटा व्यवस्थापन, तांत्रिक सहाय्य व अहवाल सादरीकरण या सर्व बाबी एकाच ठिकाणी सुलभपणे पार पाडल्या जाणार आहेत.

जिल्हाधिकारी प्रसाद यांनी सांगितले की, आगामी जनगणना प्रक्रियेत डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जाणार असून मोबाईल ॲप, ऑनलाइन डेटा एंट्री व रिअल–टाईम मॉनिटरिंग यांचा समावेश असेल. त्यामुळे माहिती संकलन अधिक वेगवान, पारदर्शक व अचूक होणार आहे. यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जनगणना कार्यात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे व जबाबदारीने काम करावे, नागरिकांशी सौजन्यपूर्ण वर्तन ठेवावे आणि प्रत्येक कुटुंबाची अचूक माहिती नोंदवावी. अशा सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागांमध्ये जनजागृती मोहिमा राबवून जनगणनेबाबत जागरूकता निर्माण करण्यात येणार असून, विविध माध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनीही जनगणना प्रक्रियेस सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी प्रसाद यांनी केले.

# निवेक ओपन २०२६ चे पारितोषिक वितरण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक इंडस्ट्रीज वेल्फेअर सेंटर तर्फे आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या प्रमुख क्रीडा स्पर्धा निवेक ओपन २०२६ च्या ३५व्या वर्षाचा पारितोषिक वितरण उत्साहात पार पडला. यंदाच्या स्पर्धेत १२ क्रीडा प्रकारांमध्ये २३५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून, एकूण २४० खेळाडूंना विविध स्पर्धांमध्ये ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. नाशिकमधील हा एक मोठा क्रीडा मंच म्हणून या स्पर्धेने पुन्हा एकदा आपली ओळख निर्माण केली.




या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य व निमाचे अध्यक्ष आशिष नहार उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निवेकचे अध्यक्ष मंगेश पाटणकर यांनी भूषवले. यावेळी उपाध्यक्ष स्वप्नील भामरे, मानद सरचिटणीस संदीप भदाणे, क्रीडा सचिव व निवेक ओपन २०२६ चे अध्यक्ष गौरव धारकर, खजिनदार शैलेश वैश्य व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ड्रम झोनच्या सादरीकरणाने झाली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार व पदाधिकाऱ्यांची मनोगते झाली. या स्पर्धेत बुद्धिबळ, बॉक्स क्रिकेट, जलतरण, जिम्नॅस्टिक्स, मॅरेथॉन, पिकल बॉल, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बॅडमिंटन आणि बिलियर्ड्स या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात योगदान देणाऱ्या प्रणव सांगवे, आदित्य अंधृटकर, विक्रांत मेहता व विशाल कस्तुरे यांना विशेष सन्मान देण्यात आला. स्व. सौ. संतोष जॉली व स्व. ओमप्रकाश जॉली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ माजी अध्यक्ष राजकुमार जॉली यांच्या हस्ते 'अपकमिंग प्लेयर' पुरस्कार विविध गटांमध्ये प्रदान करण्यात आला.

गेल्या दोन महिन्यांपासून अविरत परिश्रम घेऊन संपूर्ण स्पर्धेचे यशस्वी आयोजन करणाऱ्या निवेकच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले. स्वप्नील भामरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास निवेकचे संचालक मंडळाचे सदस्य, निवेकचे माजी अध्यक्ष, प्रशिक्षक, सदस्य, पालक व पारितोषिक विजेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सप्तशृंगी देवी यात्रेकरिता २५० अतिरिक्त बसेस

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** चैत्र पौर्णिमेनिमित्त होणाऱ्या श्री सप्तशृंगी देवी चैत्रोत्सव यात्रेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाने विशेष नियोजन केले आहे. यात्रेकरूंना सुलभ प्रवासासाठी तब्बल २५० अतिरिक्त बसेसची सोय करण्यात आली आहे. ही अतिरिक्त वाहतूक कालपासून ३ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. या दरम्यान सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी दर दहा मिनिटाला एक बस उपलब्ध असेल.

यात्रेकरूंना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रमुख ठिकाणी विशेष वाहतूक केंद्रे उभारण्यात आली आहेत. निमाणी बसस्थानक तसेच नांदुरी पायथा वाहनतळ आणि सप्तशृंगी गड वाहनतळ ही मुख्य केंद्रे असणार आहेत. यात्रेदरम्यान विविध मार्गांवरून एसटी बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नाशिक (निमाणी) ते सप्तशृंगी गड, मालेगाव, मनमाड, सटाणा, नांदगाव तसेच नांदुरी या मार्गांवरून नियमित फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. या मार्गांवर अंतरानुसार प्रवासी भाडे निश्चित करण्यात आले



असून, भाविकांना परवडणाऱ्या दरात प्रवास करता येणार आहे. यात्रेच्या काळात वाढत्या गर्दीचा विचार करून एसटी प्रशासनाने ही विशेष व्यवस्था केली असून, भाविकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, नांदुरी ते सप्तशृंगी गड या मार्गावर सर्वाधिक १२० बसेस चालवण्यात येणार आहे. या बसेसची वारंवारता अवघ्या ५ मिनिटांची असेल. तसेच सप्तशृंगी गड ते निमाणी मार्गावर ६५ बसेस (१५ मिनिटे), मालेगावसाठी ४५ बसेस (२० मिनिटे), मनमाडसाठी १५ बसेस (३० मिनिटे) आणि सटाण्यासाठी ५ बसेस (६० मिनिटे) अशा पद्धतीने नियोजन करण्यात आले आहे.

## रुपाली चाकणकर, दीपक केसरकर...

**(पान १ वरून)** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर होत असलेल्या आरोपांबाबत अंधारे यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, खरातच्या 'शिवनिका' ट्रस्टला पाणी देण्याचा ठाकरे सरकारचा निर्णय हा २०२० मधील ग्रामसभेच्या ठरावानुसार झाला होता आणि तो मानवी दृष्टिकोनातून घेतलेला निर्णय होता. दरम्यान, खरातला मिळालेल्या बंदुकीच्या परवान्याचे २०२४ मध्ये नूतनीकरण का करण्यात आले, गृहमंत्री असलेला देवेंद्र फडणवीस यांना हे माहीत नव्हते का असा सवाल अंधारे यांनी केला. या सर्व आरोपांमुळे या प्रकरणात नव्या वादाला तोंड फुटले आहे. यासंदर्भात आपल्याकडे अजून भरपूर पुरावे असून वेळप्रसंगी ते एसआयटी प्रमुखांकडे देऊ असे त्या म्हणाल्या. संगीतकार अन्नू मलिक प्रकरणाचाही उल्लेख करत अंधारे यांनी चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा असताना मलिक यांना क्लीनचीट दिली आणि त्यानंतर त्यांच्या मुलाला फिल्म इंडस्ट्रीत प्रवेश मिळाल्याचा आरोप केला. मी टू चळवळ सुरू असताना गायक आणि दिग्दर्शक अनु मलिक यांच्याविरोधात महिलांनी तक्रार केली होती.

त्यावेळी रुपाली चाकणकर यांनी अनु मलिकला क्लीन चिट दिली होती, त्यामुळेच सोहम चाकणकर याला अनु मलिकांच्या फिल्ममध्ये काम मिळाले होते, असा आरोप सुषमा अंधारे यांनी केला. यावेळी शिवसेनेचे नेते दत्ता गायकवाड, नाशिक महानगरप्रमुख, नगरसेवक प्रथमेश गिते, स्वाती पाटील, सागर कोकणे, सुभाष गायधनी, महेश बडवे, जगन आगळे, ऋषी वर्मा, निलेश साळुंखे, परवीन चव्हाण, संजय गोसावी आदी उपस्थित होते.

# पीडितांचे अश्लील व्हिडिओ, फोटो प्रसारित करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ व फोटो मॉर्फ करून सोशल मीडियावर प्रसारित करणाऱ्या ६५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सायबर पोलीस ठाण्याचे शिपाई दर्शन सोनवणे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले आहे, की दि. २७ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेदरम्यान सरकारवाडा पोलीस ठाण्यात विविध कायदे व कलमानुसार दाखल गुन्ह्यातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ, फोटो, तसेच एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मॉर्फ करून ते फेसबुक, इन्स्टाग्राम व एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसारित केले. यामुळे पीडित महिलांची ओळख, तसेच त्यांच्या नातेवाईकांची ओळख करून सार्वजनिक शिस्त व नैतिकतेस बाधा आणणारे साहित्य प्रसारित केल्याप्रकरणी ६५ वापरकर्त्यांविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# पंचवटीतून मुलाचे अपहरण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** घरी असलेल्या १३ वर्षीय मुलाला कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत त्याचे अपहरण केल्याचा प्रकार पंचवटीत घडला.

फिर्यादी हे आडगाव शिवारातील चौंडेश्वरीनगर भागात राहतात. त्यांचा १३ वर्षीय मुलगा दि. २५ मार्च रोजी घरी होता. या मुलाला कोणी तरी अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेत त्याचे अपहरण केले. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार पाटील करीत आहेत.

# लासलगाव बाजार समितीत ७ दिवस कांदा लिलाव बंद

## करोडोंची उलाढाल थंडावणार; मार्चऐंड व सणानिमित्त सुट्टी

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** कांद्याची बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या लासलगाव बाजार समितीत मार्च एंड, धार्मिक सण तसेच साप्ताहिक सुट्ट्यांमुळे सलग ७ दिवस सर्व शेतीमालाचे लिलाव बंद राहणार असल्याने करोडो रुपयांची उलाढाल थंडावणार आहे. गुरुवारी (दि. २६) पहिल्याच दिवशी बाजार समिती आवारात शुकशुकाट पाहायला मिळाला.



दरवर्षी मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात अनेक धार्मिक सण तसेच सलग सुट्ट्या आणि मार्च एंडच्या कामकाजानिमित्त बाजार समितीत सर्व प्रकारच्या शेतीमालाचे लिलाव ठप्प राहतात. यंदा दि. २६ मार्च ते १ एप्रिल असे सात दिवस बाजार समिती मधील शेतीमालाच्या लिलावाचे कामकाज बंद राहणार आहे. रामनवमीनिमित्ताने व्यापारी वर्ग बाहेरगावी जाण्याच्या कारणास्तव, शनिवारी लासलगाव बाजार समितीत बंदमुळे असा शुकशुकाट पाहायला मिळाला.

बँक व्यवहार बंद असल्याने, रविवारी साप्ताहिक, सोमवारी मजूर उपलब्ध नसल्याने, मंगळवारी महावीर जयंती, तसेच बुधवार, दि. १ एप्रिल रोजी मार्च अखेरचे बँक व्यवहार पूर्ण करण्यासाठी बँका बंद राहणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. २ एप्रिलपासून कांद्याचे लिलाव पूर्ववत होणार असल्याने शेतकऱ्यांना कांदा विक्रीसाठी २ एप्रिलपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह * पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. * Editor : Chandulal Shah * Executive Editor : Hitesh Chandulal Shah.